CMYK

**LIVE पार्श्वभूमी बीड पोर्टलसाठी**
तालुका, शहर व गावनिहाय प्रतिनिधी नेमणे आहे
संपर्क : दै.पार्श्वभूमी कार्यालय, भाजी मंडई, बीड.
संपादक गंमत भंडारी 9422295333 8623880100

# पार्श्वभूमी

**रियांश एन्टरप्राईजेस**
नामांकित कंपनीचे LED टी.व्ही. 50% पर्यंतच्या सवलती दरात मिळतील
पत्ता : शॉप नं.92 व 93 सारडा सेंट्रल, डी.पी.रोड, बीड.
Mob.9511511818

गंमत भंडारी
बीड वर्ष ३६ वे अंक ८० वा फोन २३०१०१ दिनांक १७ फेब्रुवारी २०२६ मंगळवार ई-पेपर : www.parshvbhumi.com Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 पाने ६ किंमत ४रु.

# शेतकऱ्यांची लूट थांबणार, काटेमारी बंद:आता प्रत्येक साखर कारखान्यावर डिजिटल व ऑनलाईन वजन प्रणाली

**बीड दि.१६ (प्रतिनिधी):– राज्यातील साखर कारखान्यांकडून होणाऱ्या काटेमारी संदर्भात अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी गंभीर स्वरुपाच्या तक्रारी केलेल्या आहेत. एखाद्या शेतकऱ्याचा १०० टन ऊस असेल तर जवळपास २०% काटेमारी होत असल्याच्या तक्रारी आहेत. हा शेतकऱ्यांच्या कष्टाच्या कमाईवर दिवसाढवळ्या दरोडा आहे. ही सर्व लूट बंद करण्यासाठी राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या उसाचे वजन अचूक व्हावे आणि त्यांची आर्थिक लूट थांबावी यासाठी प्रत्येक कारखान्यावर डिजिटल व ऑनलाईन प्रणाली असलेले वजन काटे बसविण्याच्या संदर्भात निर्णय जाहीर केला आहे. यामुळे कारखान्याच्या काट्यावर मोजलेल्या शेतकऱ्यांच्या ऊसाची नोंद सरकारकडे जोडलेल्या ऑनलाईन सर्व्हरवर होणार आहे. तसेच ज्या कारखान्यावर काटेमारीच्या तक्रारी वारंवार येतात त्या ठिकाणी शासकीय मालकीचे काटे बसविण्या संदर्भात कारवाई सुरु करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत, यामुळे कारखानदारांकडून शेतकऱ्यांची होणारी फसवणूक आणि लूटीला मोठ्या प्रमाणावर आळा बसणार आहे.**



स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राजू शेट्टी यांनी साखर आयुक्त कार्यालयाला सादर केलेल्या निवेदनामध्ये राज्यातील सहकारी साखर कारखाना सोडून होणाऱ्या काटेमारी संदर्भात गंभीर तक्रारी केलेल्या होत्या. शेतकऱ्यांचे उसाचे वजन अचूक व्हावे आणि होणारी आर्थिक लूट थांबावी या संदर्भात राज्य सरकारने आता पावले उचलली आहेत. राज्यातील प्रत्येक सहकारी साखर कारखान्यावर आता डिजिटल व ऑनलाईन प्रणाली कार्यरत करण्यात येणार आहे. कारखान्याचे वजन काटे राज्य शासनाच्या मुख्य सर्व्हरला ऑनलाईन जोडण्यात येणार आहेत. जेणेकरुन प्रत्येक वजनाची नोंद आता सरकारकडेही उपलब्ध असणार आहे. यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक थांबणार असून आर्थिक लुटीलाही आळा बसणार आहे. जर एखाद्या कारखान्या संदर्भात सातत्याने काटामारीच्या तक्रारी येत असतील तर त्या ठिकाणी शासन नियंत्रीत किंवा स्वतंत्र डिजिटल वजन काटे बसविण्या संदर्भात कायदेशीर तरतुद व अंमलबजावणीचा आराखडा तयार करावा. सदर वजन काटे बसविण्यासाठी निधी उपलब्ध नसल्यास आमदार/खासदार निधीतून किंवा शेतकऱ्यांच्या संमतीने त्यांच्या ऊस बिलातून नाममात्र कपात करुन हे काटे बसविण्याच्या पर्यायावर प्रशासकीय कारवाई सुरु करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. राज्य शासनाच्या साखर आयुक्तांनी हे निर्णय जारी केले आहेत. यामुळे उसाची काटेमारी बंद होणार असून पान २ वर

### कारखान्यावर मोजलेल्या प्रत्येक उसाच्या वजनाची सरकारकडे नोंद होणार

**राज्य शासनाने राज्यातील प्रत्येक सहकारी साखर कारखान्यावर डिजिटल व ऑनलाईन वजन काटे प्रणाली बसविण्याच्या सूचना देण्यात आल्यामुळे जो शेतकरी कोणत्याही खाजगी किंवा सहकारी साखर कारखान्यावर ऊस घालण्यासाठी येईल त्याच्या मोजल्या गेलेल्या उसाचे वजन कारखान्याच्या दफ्तरी तसेच शासनाच्या सर्व्हरवरही नोंदविले जाणार आहे. त्यामुळे साखर कारखान्याच्या चोरीला मोठ्या प्रमाणात आळा बसेल. शासनाच्या या निर्णयाचे शेतकऱ्यांकडून स्वागत होत आहे.**

---

**बीड नगर परिषदेचा अजब कारभार**

## रस्ता रुंदीकरणात जागा देऊनही नागरिक 'बेघर'

### सात वर्षांनंतरही जुनाच टॅक्स वसुलीचा तगादा

बीड दि.१६ (प्रतिनिधी):- नगर परिषदेच्या ढिसाळ नियोजनाचा फटका पुन्हा एकदा सामान्य नागरिकांना बसला आहे. २०१७मध्ये वार्ड क्रमांक ६ मधील मुख्य रस्त्याच्या रुंदीकरणासाठी ज्या नागरिकांनी आपल्या जमिनी आणि घरे दिली, त्यांचे पुनर्वसन करण्यात नगर परिषद अपयशी ठरली आहे. विशेष म्हणजे, ज्यांची जागा रस्त्यात गेली, त्यांनाच आजही जुन्या जागेची पावती आणि घरपट्टी (टॅक्स) लावली जात असल्याने संताप व्यक्त केला जात आहे. २०१७ साली शहर विकासाच्या नावाखाली वार्ड क्रमांक ६ मधील मुख्य रस्त्याचे रुंदीकरण करण्यात आले. यावेळी अनेक स्थानिकांनी प्रशासनाला सहकार्य करत पान २ वर

## काय होणार बीड नगर पालिकेचे

### अनेक नगर सेवकांनी नेमले खाजगी कर्मचारी

बीड दि.१६ (प्रतिनिधी):- बीड नगर पालिकेमध्ये काय चालू आहे? शासनाचे नियुक्त कर्मचारी वेगवेगळ्या विभागामध्ये नेमून दिलेल्या पदावर कार्यरत असतांना अनेक नगर सेवकांनी त्यांच्या खुर्चीला खुर्ची चिटकवून आपले खाजगी कर्मचारी आणून बसविलेले आहेत. मुख्याधिकारी मात्र हा सर्व प्रकार उघड्या डोळ्याने पहात आहेत. नियमानुसार शासकीय कार्यालयातील दस्तावेज साधन सामुग्री हाताळण्याचा अधिकार खाजगी व्यक्तिला नाही. मात्र बीड नगर पालिकेत या सर्व नियमांना गुंडाळून ठेवले जात असल्याने येत्या काळात बीड नगर पालिकेचे काय होणार? देवच जाणे असा प्रश्न निर्माण झाला आहे.

बीड नगर पालिकेमध्ये विशेष करुन जन्म-मृत्यू विभाग, पाणी पुरवठा, विद्युत, बांधकाम परवानगी, स्वच्छता या विभागांमध्ये काही नगर सेवकांनी खाजगी व्यक्तिंना आणून चक्क नगर पालिकेच्या कामाला जुंपले आहे. असा परस्पर कारभार करता येतो का? मुख्याधिकारी याकडे लक्ष का देत नाहीत? नगर पालिकेत असलेल्या जबाबदार नगर सेवकांनी तरी याकडे लक्ष देऊन आवाज उठविला पाहिजे. काही नगर सेवकांना दोन पेक्षा जास्त अपत्य असल्याचे खटले सध्या चालू आहेत. त्या अनुषंगाने देखील आवक जावक, जन्म-मृत्यू या ठिकाणी अनेक नगर सेवकांचे खाजगी लोक बसून असतात, हे कशासाठी? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### अमृत योजनेचे काम पूर्ण करण्यासाठी आणि लिकेज दुरुस्तीमुळे

## बीडचा पाणी पुरवठा ४ दिवस उशिरा होणार

बीड दि.१६ (प्रतिनिधी):- काडीवडगाव ते बीडपर्यंतच्या अमृत योजनेचे अपूर्ण काम पूर्ण करण्यासाठी व लिकेज दुरुस्तीच्या कामामुळे बीड शहराचा संपूर्ण पाणी पुरवठा ४ दिवस उशिरा होणार असल्याचे नगर पालिकेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांनी कळविले आहे.

काडीवडगाव, ईट जल शुद्धीकरण केंद्र ते एमबीआर बीड शहरापर्यंत अमृत योजनेचे ७५० एमएम व्यासाचा मुख्य वितरण नलिकेवरील नॉन रिटर्न व्हॉल्यूची दुरुस्ती करणे, काडीवडगाव येथील अशुद्ध पाणी उपसा केंद्र व जलशुद्धीकरण केंद्र, ईट येथील विद्युत उपकरणे आणि पम्पींग मशनरी बसविणे, त्याचबरोबर लिकेज दुरुस्ती करणे अशी अपूर्ण कामे पूर्ण करण्याचे काम नगर पालिकेने हाती घेतले आहे. दि.१७ फेब्रुवारी ते २० फेब्रुवारी २०२६ या कालावधीत हे काम होणार आहे. त्या अनुषंगाने बीड नगर परिषदेकडून ४ दिवस शटर डाऊन घेण्यात येणार आहे. यामुळे बीड शहराचा संपूर्ण पाणी पुरवठा ४ दिवसांनी उशिरा होणार आहे. याची नोंद शहरातील सर्व जनतेने घ्यावी. पाणी जपून वापरावे व बीड नगर परिषदेला सहकार्य करावे असे आवाहन मुख्याधिकारी शैलेश फडसे यांनी केले आहे.

---

## आजपासून आरटीई प्रवेश प्रक्रिया सुरू

बीड दि.१६ (प्रतिनिधी):- शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) खासगी शाळांमधील २५ टक्के राखीव जागांसाठी राबविण्यात येणाऱ्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेला आज मंगळवार (दि.१७ फेब्रुवारी) पासून सुरुवात होत आहे. त्यानुसार

## जिल्ह्यात २ हजार ४०० विद्यार्थ्यांना मिळणार आरटीई अंतर्गत मोफत प्रवेश - मनोज जाधव



पालकांना मुलांचे अर्ज १० मार्चपर्यंत भरता येणार असल्याची माहिती शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी दिली आहे. आर्थिक दुर्बल व वंचित घटकांतील विद्यार्थ्यांसाठी शिक्षण हक्क कायद्यानुसार इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये मोफत शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. यंदाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी ९ जानेवारी रोजी शाळा नोंदणी प्रक्रिया सुरू झाली होती. मुदतवाढीसह ही प्रक्रिया ३० जानेवारी रोजी बंद करण्यात आली. जिल्ह्यात प्रवेशासाठी २१३ शाळांची नोंदणी झाली असून २ हजार ४०० जागा उपलब्ध आहेत. मंगळवारपासून प्रत्यक्ष प्रवेश प्रक्रियेला सुरुवात होत असून पात्र पालकांनी आपल्या पान २ वर

### पोद्दार इंग्लिश स्कूलचे अल्पसंख्यांक प्रमाणपत्र तात्काळ रद्द करा -मनोज जाधव

**पोद्दार इंग्लिश स्कूलने आरटीई प्रवेशातून पळवाट काढण्यासाठी अल्पसंख्यांक प्रमाणपत्र घेतले असून हे प्रमाणपत्र नियमबाह्य पद्धतीने शासनाकडून देण्यात आल्याचा आरोप करण्यात येत आहे. शाळा सुरू झाल्यानंतर आरटीई प्रवेश टाळण्यासाठी अशा प्रकारे प्रमाणपत्र देणे चुकीचे असल्याचे मत मनोज जाधव यांनी व्यक्त केले आहे.या संदर्भात मुख्यमंत्री, शिक्षण मंत्री व शिक्षण संचालक यांच्याकडे रीतसर तक्रार दाखल करण्यात आली असून संबंधित** पान २ वर

---

## ज्यांच्यामुळे मुलाचा जीव गेला त्यांना नोटीसही नाही मात्र न्यायाची मागणी करणाऱ्यांवर गुन्हे दाखल केले

### शेख मुजीब, भागवत तावरे, भैय्या मोरे, महेश धांडेंसह ३० जणांविरुद्ध गुन्हा

बीड दि.१६ (प्रतिनिधी):- उघड्या डीपीमुळे एका १५ वर्षीय मुलाचा जीव गेला, याला महावितरणचे अधिकारी, कर्मचारी आणि हायटेक कंपनी जबाबदार असल्याचा आरोप होत आहे. ज्यांच्यामुळे जीव गेला त्यांना पोलिसांनी साधी नोटीसही पाठविली नाही, मात्र मयत मुलाच्या कुटुंबियाना न्याय मिळावा आणि दोषींवर गुन्हे दाखल व्हावेत या मागणीसाठी आंदोलन करणाऱ्या ३० ते ३२ जणांविरुद्ध शिवाजी नगर पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत. पोलिसांच्या अशा अजब तत्परतेविरुद्ध संताप व्यक्त होऊ लागला आहे. विशेष म्हणजे मयत मुलाच्या नातेवाईकांना आणि आंदोलकांना स्वत: पोलीस अधीक्षकांनी चौकशी करुन दोषींवर गुन्हे दाखल करु असे आश्वासनही दिले होते. त्यानंतरच मृतदेह ताब्यात घेऊन आंदोलन मागे घेण्यात आले होते.



बीड शहरातील बालेपीर गोरे वस्ती येथील शेख आवेज या १५ वर्षीय मुलाचा उघड्या डीपीला चिटकल्याने शॉक बसून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना रविवारी सायंकाळी घडली होती. या प्रकरणात महावितरणच्या दोषी कर्मचाऱ्यांवर आणि हायटेक कंपनी विरुद्ध कारवाई करावी अशी मागणी नातेवाईकांनी केली होती. त्यानंतरही पोलीस काही कारवाई करत नसल्याने सोमवारी दुपारी मयत मुलाच्या नातेवाईकांसह भागवत तावरे, शेख पान २ वर

### महावितरणची नियमावली आणि कायदेशीर मुद्दा

**पोलीस चौकशी करुन गुन्हा दाखल करु असे म्हणत असले तरी नियमानुसार गंभीर प्रकरणात तक्रार प्राप्त होताच एफआयआर नोंदविणे आवश्यक असते. काही दिवसांची प्रतीक्षा करण्याचा कोणताही सक्तीचा नियम कायद्यात नाही, विशेषत: जिथे निष्पाप बालकाचा बळी गेला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या एका ऐतिहासीक निकालानुसार जर तक्रारीमध्ये एखादा दखलपात्र गुन्हा घडल्याचे दिसून येत असेल तर पोलिसांनी तात्काळ एफआयआर नोंदविणे बंधनकारक आहे. चौकशी करु आणि मग गुन्हा नोंदवू असे म्हणने सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन ठरु शकते, हा कायदेशीर मुद्दा आहे.** पान २ वर

## बीडमध्ये अंबिका चौक, राजीव गांधी चौकातील सर्व अडथळे तत्काळ हटवा

- भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या बीड न.प. प्रशासनाला सूचना
- वाहतूक कोंडीवर उपाययोजना करण्यासाठी दोन्ही चौकात यंत्रणेसोबत पाहणी





बीड दि.१६ (प्रतिनिधी):- शहरातील अत्यंत वर्दळीचे अंबिका चौक आणि राजीव गांधी चौक येथील वाहतूक कोंडी कमी करून वाहतूक सुरळीत करण्यासाठी निर्माण झालेले सर्व प्रकारचे अडथळे तात्काळ हटविण्याच्या सूचना भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी बीड नगरपरिषद प्रशासनाला दिल्या. यासंदर्भात त्यांनी मुख्याधिकारी शैलेश फडसे आणि संबंधित यंत्रणेसोबत सोमवारी (दि.१६) दोन्ही चौकांची प्रत्यक्ष पाहणी केली. अंबिका चौकातील सुशोभीकरणामुळे वारंवार निर्माण होणारा वाहतुकीचा अडथळा दूर करण्याबरोबरच परिसरातील अतिक्रमणे हटविण्याची गरज आहे. तसेच, राजीव गांधी चौकातील

### वाहतूक पोलिसांच्या नेमणुकीसाठी पोलीस अधीक्षकांना भेटणार

**अंबिका चौक, राजीव गांधी चौक या वर्दळीच्या ठिकाणी सकाळी व संध्याकाळी मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असल्याने या ठिकाणी कायमस्वरूपी वाहतूक पोलिसांची नेमणूक करण्याबाबत पोलीस अधीक्षकांना भेटून चर्चा करणार असल्याचे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सांगितले.** पान २ वर

**स्टोअर ऑफीसर पाहिजे**
टॅली सॉफ्टवेअर, स्टोअर अनुभवी असलेल्या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल
पगार - 18 हजार ते 25 हजार
:: संपर्क ::
विक्की मोटार्स
जालना रोड, बीड.
9326685085

**त्वरीत पाहिजे**
**पूर्ण वेळ अकाऊंटंट**
कामाची वेळ : सकाळी १०.३० ते सायं.६ पर्यंत
शिक्षण : बी.कॉम.
ERP/excel & expert in online work
विकी मोटार्स
जालना रोड, बीड.
Mob.9326685085

**उठावना**

घनश्याम, उमेश सिकची के पिताजी, सागर एवं केदार के दादाजी
श्रीराम नंदलालजी सिकची (बेलुरावाला)
इनका दुःखद निधन १५/०२/२०२६ रविवार को हुवा।
जिनका उठावना मंगलवार दिनांक १७/०२/२०२६ को दोपहर ४ बजे निजीनिवास, बनवारी बिल्डिंग, सारडा रेसिडेन्सी, बीड यहा पर होंगा।
:: शोकाकुल ::
बाळकिशन सुभाषचंद्र सिकची एवं सिकची परिवार, बेलूरावाला.

## वडवणीचे माजी उपसरपंच अभिमन्यू जगताप यांचे निधन

### नगराध्यक्ष शेषेराव जगताप व भारत जगताप यांना पितृशोक



वडवणी दि.१६ (प्रतिनिधी) :- वडवणी येथील नगराध्यक्ष शेषेराव बाप्पु जगताप व राष्ट्रवादीचे नेते भारत दादा जगताप यांचे वडील माजी उपसरपंच तसेच सर्वपरिचीत व्यक्तीमत्त्व अभिमन्यू आण्णा जगताप यांचे काल दि.१५ फेब्रुवारी २०२६ रविवार रोजी वयाच्या ७१ व्या वर्षी उपचारादरम्यान निधन झाले आहे. त्यांच्यावर मागील पाच दिवसांपासून छत्रपती संभाजीनगर येथील एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरु होते. मात्र उपचारादरम्यान रात्री १०.१५ वाजता त्यांची प्राणज्योत मालवली. सोमवारी वडवणी शहरातील पान २ वर

## अजितदादांच्या निधनाच्या दिवशीच ७५ फाईलींना मंजुरी

मुंबई दि.१६ (प्रतिनिधी):- विकास कामांबाबत दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांना उपमुख्यमंत्री अजित पवारांनी झापल्याचे आपण पाहिले आहे, पण ज्या दिवशी अजितदादांचे विमान अपघातात अकाली निधन झाले त्याच दिवशी काही असंवेदनशील अधिका-यांनी मंत्रालयात बसून चक्क जवळपास २० संस्थांच्या ७५ फाईलींवर पान २ वर

CMYK

# शेती कर्जाच्या अनुषंगाने उद्यापर्यंत शेतकऱ्यांनी आधार कार्ड जमा करावे

## ▪ बीड जिल्हा बँकेचे सीईओ ठोंबरेंचे आवाहन ▪

बीड दि.१६ (प्रतिनिधी):- राज्यातील शेती आणि शेतकऱ्यांच्या जीवनात आमुलाग्र बदल घडवून शेतकऱ्यांची थकीत कर्जाच्या विळख्यातून सोडवणूक करण्यासाठी आपतकालीन व दीर्घकालीन उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने शेती कर्जाची माहिती पोर्टलवर भरण्याचे काम युद्ध पातळीवर सुरु आहे. मात्र बीड जिल्ह्यातील बहुतांश शेतकऱ्यांनी त्यांचे आधार कार्ड जिल्हा बँकेच्या शाखेत किंवा सेवा सहकारी संस्थेत जमा केलेले नाहीत. दोन दिवसात म्हणजेच आज आणि उद्या दि.१८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत आधार कार्ड जमा करावेत असे आवाहन बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी शरद ठोंबरे यांनी केले आहे. बीड जिल्ह्यातील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेमार्फत व जिल्हा मध्यवर्ती बँकेमार्फत घेतलेल्या कर्जाबाबत शेतकऱ्यांनी केवायसी करणे आवश्यक आहे. तसेच जे शेतकरी मयत झाले असतील त्यांच्या वारसांनी विविध सेवा सहकारी संस्था व जिल्हा मध्यवर्ती बँकेत वारसांची नावे देऊन त्यांचे आधार कार्ड संबंधीत गटसचिव व बँकेचे शाखाधिकारी यांच्याकडे जमा करावेत. शासनाने दि.१८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे त्यामुळे दोन दिवसात आधार कार्ड गटसचिव, शाखाधिकाऱ्यांकडे जमा करावेत अन्यथा आधार कार्ड न दिल्यास या योजनेपासून वंचित राहिल्यास त्यास संस्थेचे चेअरमन, संचालक मंडळ व संबंधीत थकबाकीदार सभासद हे जबाबदार राहतील याची बीड जिल्ह्यातील सर्व थकबाकीदार शेतकऱ्यांनी नोंद घ्यावी असे आवाहन ठोंबरे यांनी केले आहे.

# लाडकी बहीण योजना e-KYC मुदत वाढली, पण सर्वांसाठी नाही

बीड दि.१६ (प्रतिनिधी):- राज्य सरकारच्या 'लाडकी बहीण' योजनेबाबत e-KYC संदर्भात महत्त्वाची स्पष्टता समोर आली आहे. ३१ मार्चपर्यंत मुदत वाढवण्यात आल्याची माहिती समोर आल्यानंतर अनेक महिला नव्याने e-KYC करता येईल, या अपेक्षेने संकेतस्थळावर लॉगिन करत आहेत. मात्र, ही मुदत सर्वांसाठी नसल्याचे पोर्टलवरील सूचनेत स्पष्ट करण्यात आले आहे.
'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेअंतर्गत पात्र महिलांना दरमहा १५०० रुपयांची आर्थिक मदत दिली जाते. लाभ योग्य व्यक्तींपर्यंत पारदर्शक पद्धतीने पोहोचावा, यासाठी e-KYC सक्तीची करण्यात आली होती. मात्र प्रत्यक्ष प्रक्रियेदरम्यान अनेक महिलांना तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागला. मोबाईल वा इंटरनेट सुविधा नसणे, आधार-बँक खाते लिंक नसणे, ओटीपी न मिळणे, तसेच ऑनलाइन फॉर्ममधील तांत्रिक बाबी न समजल्याने अनेक अर्ज अपूर्ण राहिले. काही ठिकाणी सायबर कॅफे किंवा मध्यस्थांच्या मदतीने प्रक्रिया पूर्ण करण्यात आली; मात्र चुकीची माहिती भरली जाणे, आवश्यक कागदपत्रे अपलोड न होणे किंवा उत्पन्न निकषांमुळे काही लाभार्थी अपात्र ठरल्याच्या तक्रारी पुढे आल्या. विशेषतः ज्या महिलांनी e-KYC करताना चुकीचा पर्याय निवडला, त्यांच्या नोंदी अडकल्या. याच पार्श्वभूमीवर महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी यापूर्वी स्पष्ट केले होते की, ज्यांच्या e-KYC प्रक्रियेत त्रुटी राहिल्या आहेत, अशा पात्र लाभार्थ्यांना माहिती दुरुस्तीसाठी ३१ मार्च २०२६ पर्यंत संधी देण्यात येत आहे.

## राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त

# बीडमध्ये १५० प्रतिमांचे वाटप



बीड दि.१६ (प्रतिनिधी):- राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त बीड शहरात अत्यंत उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात १५० प्रतिमांचे वाटप करण्यात आले. शुक्रवार दि.१३ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या पुतळ्याजवळ हा कार्यक्रम संपन्न झाला. समाजप्रबोधन, स्वच्छता आणि सेवा या त्यांच्या विचारांचा जागर जागर प्रसार व्हावा, या उदात्त हेतूने हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून बीडचे रहिवासी व सध्या धाराशिव पोलीस ठाण्यातून सेवानिवृत्त पीएसआय किशोर रोकडे यांच्या हस्ते प्रतिमांचे वितरण करण्यात आले. त्यांच्या हस्ते झालेल्या या वितरणामुळे कार्यक्रमाला विशेष गौरव प्राप्त झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य परीट धोबी समाजसेवा मंडळाचे बीड जिल्हाध्यक्ष तथा मराठवाडा विभागीय युवक अध्यक्ष ॲड. सुधीर जाधव हे होते. यावेळी परीट समाजाचे ज्येष्ठ नेते दत्तात्रय नलावडे, राज्य कार्याध्यक्ष गणेश जगताप, जिल्हा कार्याध्यक्ष रमेश घोडके, पप्पू शिंदे, जगन्नाथ शिंदे, रवी जाधव, जिल्हाध्यक्ष मोहन राऊत, गणेश राऊत, जिल्हा सचिव प्रवीण साळुंके, जिल्हा उपाध्यक्ष जिजा शिंदे, मराठवाडा विभागीय युवक उपाध्यक्ष संतोष पवार, उपाध्यक्ष शितल राऊत, युवक शहराध्यक्ष मंगेश घोडके, शहर कार्याध्यक्ष संतोष भालेकर तसेच राष्ट्रसंत गाडगे महाराज जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष संजय साळुंके, उपाध्यक्ष नितीन नवले, सचिव महेंद्र वाघमारे, बाबू भालेकर, विक्रम वाघमारे, किशोर जाधव, उमा शंकर जाधव, प्रविण जगताप, नारायण राऊत, अजय जाधव, संतोष मस्के, नवले अभिषेक, जाधव संजय, वाघमारे महेश शिंदे, मनोज वाघमारे यांच्यासह अनेक मान्यवर व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.
कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या समाजसेवा, अंधश्रद्धा निर्मूलन आणि स्वच्छता अभियानातील कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. त्यांच्या विचारांचा वारसा जपण्याचा आणि पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.
या उपक्रमामुळे समाजात एकात्मता, सेवा आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश दृढ झाला असून, कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडल्याबद्दल आयोजकांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

पान १ वरून

## शेतकऱ्यांची लूट थांबणार

कारखान्यावर मोजल्या जाणाऱ्या उसावर आता सरकारची नजर असणार आहे. शेतकऱ्यांच्या दृष्टीने हा निर्णय अत्यंत महत्वाचा आहे. याची योग्य पद्धतीने अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

## अभिमन्यू जगताप यांचे निधन

वैकुंठधाम याठिकाणी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रसंगी जिल्ह्यातील जगताप कुटुंबीयांचे नातेवाईक, आप्तेष्ट, मित्रमंडळी, राजकीय, सामाजिक, अध्यात्मिक, शासकीय, वैद्यकीय, व्यावसायिक, न्याय व्यवस्था यांसह सर्वच क्षेत्रातील मान्यवर, अधिकारी, पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी उपस्थित राहून दिवंगत अभिमन्यू जगताप यांना श्रध्दांजली अर्पण केली.
याबाबत अधिक माहिती अशी की, प्राण जाये पर वचन ना जाये अगदी याप्रमाणे जीवनभर सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात रुबाबदार व निर्भिडपणे आयुष्य जगणारे आणि शुन्यातून आजच्या मोठ्या विश्वाची निर्मिती करत आपल्या दोन्ही मुलांना आणि संपूर्ण कुटुंबाला व्यवसाय व राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात मोठ्या उंचीवर घेवून जाणारे धिरोदत्त अभिमन्यू आण्णा जगताप यांचे असे अकाली जाणे सर्वांच्याच मनाला चटका लावून गेले. बरोबर अठरा वर्षांपूर्वी भयंकर अपघातामध्ये मृत्यूलाही हरवून यमराजाला रिकाम्या हाताने परत पाठविणारे अभिमन्यू आण्णा हे या वेळचे अभिमन्यू चक्र भेदण्यात मात्र अयशस्वी ठरले. गेल्या महिन्यात राहत्या घरी पाय घसरुन पडल्याने त्यांच्या पायाला इजा झाली होती. त्याची शस्त्रक्रिया यशस्वी पूर्ण होवून त्यांना डिस्चार्ज ही देण्यात आला होता. मात्र पाच दिवसांपूर्वी परत एकदा ब्लड प्रेशर व अन्य शारिरीक त्रासांमूळे त्यांना छत्रपती संभाजीनगर येथील एका खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. दाखल केले तेंव्हापासूनच त्यांची तब्येत नाजूक अवस्थेत होती. मात्र दोन्ही चिरंजीव भारत जगताप व शेषेराव जगताप यांनी आणि रुग्णालयाच्या सर्व स्टाफ यांनी त्यांच्या तब्येतीत सुधारणा व्हावी यासाठी अपार मेहनत घेतली परंतू नियतीच्या मनात काहीतरी वेगळं होतं आणि काल दि.१५ फेब्रुवारी २०२६ रविवार रोजी वयाच्या ७१ व्या वर्षी उपचारादरम्यान रात्री १०.१५ वाजता त्यांची प्राणज्योत मालवली. वडवणी परिसरात ही निधन वार्ता कळताच सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात होती. सोमवारी दुपारी १२ वाजता वडवणी शहरातील वैकुंठधाम याठिकाणी अतिशय जड अंतःकरणाने व साश्रू नयनांनी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रसंगी जिल्ह्यातील जगताप कुटुंबीयांचे नातेवाईक, आप्तेष्ट, मित्रमंडळी, राजकीय, सामाजिक, अध्यात्मिक, पत्रकारिता, शासकीय, वैद्यकीय, व्यावसायिक, न्याय व्यवस्था यांसह सर्वच क्षेत्रातील मान्यवर, अधिकारी, पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी उपस्थित राहून दिवंगत अभिमन्यू जगताप यांना श्रध्दांजली अर्पण केली. त्यांच्या पश्चात कुटुंबामध्ये दोन मुले राष्ट्रवादीचे नेते भारत जगताप व नगराध्यक्ष शेषेराव जगताप, एक मुलगी, जावाई, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या अस्थी सावडण्याचा विधी आज दि.१७ मंगळवार रोजी सकाळी ८ वाजता होणार आहे.

## ज्यांच्यामुळे मुलाचा जीव गेला त्यांना नोटीसही नाही

मुजीब, भैय्या मोरे, शाहेद पटेल, महेश धांडे, अफसर उर्फ आय्युब खान, खय्यूम इनामदार यांच्यासह अनेकांनी पी.एम.रुम समोरील हायवे वर ठिय्या आंदोलन केले होते. या प्रकरणाची दखल घेत पोलीस अधीक्षकांनी चौकशी करुन कारवाई करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले आणि तब्बल २० तासानंतर मुलाचा मृतदेह नातेवाईकांनी ताब्यात घेतला. या प्रकारानंतर महावितरणच्या कर्मचाऱ्यांची आणि हायटेक कंपनीच्या संबंधितांची चौकशी होऊन गुन्हे दाखल होतील असे वाटले होते. मात्र पोलिसांनी आंदोलकांवरच गुन्हे दाखल केले आहेत. शिवाजी नगर ठाण्याचे प्रभारी पो.उप.नि. सतीश भवर यांच्या फिर्यादीवरुन सार्वजनिक रस्ता बंद करुन रहदारीस अडथळा केला आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या जमाव बंदी आदेशाचे उल्लंघन केल्या प्रकरणी भागवत हरिहर तावरे, शेख मुजीब, भैय्या सिताराम मोरे, शाहेद मुजफ्फर पटेल, महेश अर्जुन धांडे, अफसर उर्फ आय्युबखान करीमखान, शेख आमेर शेख रफीक, शेख अब्दुल इम्रान शेख हमीद, शेख इरफान शेख लियाकत, खय्युम इनामदार, शेख रोहील शेख रफीक, सोहेल शेख यांच्यासह इतर २० जणांविरुद्ध जमावबंदी आदेश म.पो.का. कलम १९५१ चे कलम ३७(१)(३) महाराष्ट्र पोलीस कायद्या प्रमाणे प्रतिबंधात्मक आदेश चालू असतांना सदर आदेशाचे उल्लंघन केले म्हणून कलम १८९(२), १९०, १२६(३), २८५ बी.एन.एस. व १३५ म.पो.का. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## महावितरणची नियमावली आणि कायदेशीर मुद्दा

**महावितरणच्या नियमानुसार डीपीला कुंपण असणे आणि तो लॉक असणे अनिवार्य आहे. जर डीपी उघडी असेल तर तो सरळ सरळ कर्तव्यात कसूर मानला जातो, यासाठी कोणत्याही मोठ्या चौकशीची गरज नसते. कारण परिस्थिती स्वत:च पुरावा असते. डीपी उघडी**

**असणे हा त्या भागातील संबंधीत इंजिनीअरचा निष्काळजीपणा देखील ठरु शकतो.**

## बीडमध्ये अंबिका चौक, राजीव गांधी चौकातील अतिक्रमणे हटवा

मध्य रस्त्यात उभा असलेला विजेचा खांब तातडीने हलविण्याची मागणीही करण्यात आली. अंबिका चौकातील रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) अन्यत्र हलविण्याबाबत महावितरण कँपनीच्या अधिकाऱ्यांशीही चर्चा करण्यात आली. ही कामे लवकरात लवकर मार्गी लागण्यासाठी महावितरण कँपनीकडे सातत्याने पाठपुरावा करावा, अशा सूचना डॉ.क्षीरसागर यांनी दिल्या. यावेळी मुख्याधिकारी शैलेश फडसे यांनी दोन्ही चौकातील समस्यांवर तातडीने कार्यवाही करण्याचे आश्वासन देत संबंधित विभागांना आवश्यक सूचना दिल्या. नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत वाहतुकीची सुलभता वाढविण्यासाठी प्रशासनाने त्वरीत उपाययोजना कराव्यात, असेही डॉ.क्षीरसागर यांनी सांगितले. यावेळी स्थानिक नागरिकांसह भाजपचे युवा नेते नागेश तांबारे, नगरसेवक मंगेश धोंगडे, सरपंच अमोल बागलाने, राजू महुवाले, बाळासाहेब शिंदे आदी उपस्थित होते.

## रस्ता रुंदीकरणात जागा देऊनही नागरीक बेघर

आपल्या हक्काची जागा रस्त्यासाठी दिली. मात्र, सात वर्षे उलटूनही या नागरिकांना पर्यायी जागा किंवा योग्य मोबदला मिळालेला नाही. यामुळे अनेक कुटुंबे आजही हक्काच्या निवाऱ्यासाठी इतरत्र भटकत आहेत. नागरिकांची जागा तर गेलीच, पण नगर परिषदेच्या रेकॉर्डवर मात्र अजूनही जुनीच बांधकामे दिसत आहेत. प्रशासनाने अद्याप या मालमत्तांचे फेरसर्वेक्षण केलेले नाही. रस्त्यात गेलेल्या जागेवरही जुनाच टॅक्स आकारला जात आहे.

नागरिकांना वारंवार कराच्या नोटिसा बजावल्या जात आहेत
नव्याने घराचे बांधकाम किंवा पुनर्वसन करण्यासाठी कोणतीही तांत्रिक मदत दिली जात नाहीये.
आम्ही शहराच्या विकासासाठी आमची घरे दिली पण आज आम्हालाच रस्त्यावर येण्याची वेळ आली आहे. नगर परिषद आमची अडवणूक करत असून, रस्ता झालेल्या जागेचा टॅक्स आमच्याकडून वसूल करणे हा अन्याय आहे. नागरिकांकडून तीव्र निषेध नगर परिषदेच्या या आडमुठ्या धोरणामुळे परिसरातील नागरिक प्रचंड संतप्त झाले आहेत. वारंवार पाठपुरावा करूनही अधिकारी दाद देत नसल्याने, नागरिकांनी आता नगर परिषदेचा जाहीर निषेध केला आहे. या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन टॅक्स रद्द करावा आणि बाधित नागरिकांचे पुनर्वसन करावे, अशी मागणी जोर धरत आहे.

## अजितदादांच्या निधनाच्या दिवशीच ७५ फाईलींना मंजुरी

सह्या करत त्या शाळांना अल्पसंख्याक दर्जा देण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे उघडकीस आले आहे. अजितदादांच्या अपघाती मृत्यूला अवघे काही तास उलटलेले असताना त्यांच्याकडे असलेल्या अल्पसंख्यांक खात्यात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांनी हा दिव्य प्रताप केला आहे.
अजितदादांच्या निधनामुळे राज्यात २८ ते ३० जानेवारी पर्यंत तीन दिवसांचा दुखवटा असताना निर्ढावलेपणा या सरकारी अधिकाऱ्यांची या फाईलींवर सह्या कशा केल्या. याबाबत प्रदेश युवक काँग्रेसचे सरचिटणीस अक्षय जैन यांनी म्हटले की, २८ जानेवारी रोजी ज्यादिवशी अजित पवारांचे निधन झाले. त्यानंतर अचानक राज्यातील २० संस्थांच्या ७५ शाळांना २८ ते ३० जानेवारी या कालावधीत संध्याकाळी ६.३० वाजता, ७ वाजता, ८ वाजता अधिका-यांनी तातडीने प्रमाणपत्र वाटपाचा निर्णय घेण्यात आला.
३ महिन्यापूर्वी या प्रमाणपत्रांना स्थगिती दिली होती. तरीही अधिका-यांनी त्यावर लगेचच सह्या करुन या फाईली निकाल्या काढल्या. अजित पवार यांच्या निधनानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शासकीय दुखवटा जाहीर केल्यानंतरही मंत्रालयात बसून अडकलेल्या फाईलींवर सह्या करणारे अधिकारी कोण? असा सवाल विचारण्यात येत आहे.

## पोद्दार इंग्लिश स्कूलचे अल्पसंख्याक प्रमाणपत्र तात्काळ रद्द करा

**शाळांना देण्यात आलेले अल्पसंख्यांक प्रमाणपत्र तात्काळ रद्द करावे, अशी मागणी मनोज जाधव यांनी केली आहे.**

## आजपासून आरटीई प्रवेश प्रक्रिया सुरु...

पाल्याचे अर्ज वेळेत दाखल करावेत, असे आवाहन मनोज जाधव यांनी केले आहे.

यंदा कागदपत्रे अपलोड करणे अनिवार्य

आरटीई प्रवेशासाठी काही पालकांकडून कागदपत्रांमध्ये अफरातफर झाल्याचे प्रकार यापूर्वी उघडकीस आले होते. त्यामुळे यंदा शिक्षण विभागाने अर्ज भरतानाच आवश्यक कागदपत्रे ऑनलाइन अपलोड करणे अनिवार्य केले आहे.

महत्त्वाच्या सूचना

- आरटीई पोर्टलवर निवासस्थानापासून १ कि.मी.किंवा त्यापेक्षा कमी अंतरावरील शाळांची माहिती दिसेल.
- एकापेक्षा अधिक अर्ज भरल्यास कोणताही अर्ज लॉटरी प्रक्रियेसाठी ग्राह्य धरला जाणार नाही.
- पालकांना किमान दहा शाळांची निवड करावी लागेल.
- केवळ मेसेजवर अवलंबून न राहता पोर्टलवरील सूचनांचे पालन करावे.
- चुकीची माहिती दिल्यास कोणत्याही टप्प्यावर प्रवेश रद्द करण्यात येईल.
- अर्ज भरताना निवासस्थानाचा पत्ता अचूक नमूद करणे आवश्यक आहे.

ही कागदपत्रे अपलोड करणे अनिवार्य

१) आई किंवा वडिलांचे आधार कार्ड
२) बालकाचे जन्मप्रमाणपत्र व वास्तव्याचा पुरावा
३) भाडेतत्त्वावर राहणाऱ्या पालकांच्या बाबतीत दुय्यम निबंधक कार्यालयातील नोंदणीकृत भाडेकरारनाम्याची प्रत (सर्व संबंधित घटकांसाठी अनिवार्य)
४) सामाजिक वंचित घटकांसाठी पालकांचा/बालकाचा जात दाखला व अपंगत्वाचे प्रमाणपत्र (परराज्यातील जात प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाणार नाही.)
५) आर्थिक दुर्बल घटकांसाठी पालकांचा वार्षिक उत्पन्नाचा दाखला रुपये एक लाखांपेक्षा कमी (सन २०२३-२४ किंवा २०२४-२५ या वर्षांतील दाखला ग्राह्य)


## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाव्दारे सुचित करण्यात येते की, आमचे पक्षकार वादी विठ्ठल खिरा चव्हाण यांनी मा.दिवाणी न्यायाधिश, दिवाणी न्यायालय गेवराई येथे मौजे गेवराई येथील वादग्रस्त मिळकत सर्व्हे नंबर ५४४/अ मधील ०२ एकर ०४ गुंठे, सर्व्हे नंबर ५४४/ब मधील ०२ एकर ०४ गुंठे व सर्व्हे नंबर ५४४/ड मधील ०२ एकर हि मिळकत प्रतिवादी खिरा काळु चव्हाण व इतर यांनी वाटुन द्यावी म्हणुन दि.दा.नं. १०४१/२०१५ हा मे. कोर्टात दाखल केला आहे, वरील दाव्यातील प्रतिवादींशी संगनमत करुन सदर मिळकत विक्री करावयाच्या विचारात आहेत. तरी तमाम जनतेस कळविण्यात येते की, जोपर्यंत वरील दाव्याचा निकाल लागत नाही, तोपर्यंत सदर मिळकती बाबत कोणीही प्रतिवादी बरोबर खरेदी, विक्रीचा अथवा तारण, गहाण, दान, बक्षीस किंवा अन्य मार्गाने हस्तांतरणाचा व्यवहार करु नये. केल्यास त्यांच्या विरुध्द कठोर कायदेशीर कार्यवाही केली जाईल व होणाऱ्या खर्चाची व परिणामाची जबाबदारी वरील नमुद दाव्यातील प्रतिवादी व खरेदी करणार यांच्यावर राहील. करीता हे जाहीर प्रगटन.

मार्फत
ॲड.एच.एस.पाटील, गेवराई
मो.क्र. ९८२२९२२७७७

–जाहीर प्रगटन देणार–
विठ्ठल खिरा चव्हाण


# छत्रपती मल्टिस्टेटचे आरोपी अजुनही फरार का? ठेवीदार आक्रमक

## २४ फेब्रुवारीच्या मुंबईतील मोर्चासाठी गेवराईतील ठेवीदारांनी आवळली वज्रमूठ




बीड दि.१६ (प्रतिनिधी):- बुडीत पतसंस्था व मल्टिस्टेटमधील अडकलेल्या ठेवी परत मिळाव्यात या मागणीसाठी २४ फेब्रुवारी रोजी मुंबई येथे काढण्यात येणाऱ्या भव्य मोर्चासाठी ठेवीदार कृती समितीचे मुख्य प्रवर्तक प्रा.सचिन भैय्या उबाळे यांच्या उपस्थितीत रविवारी गेवराईत झालेल्या बैठकीत ठेवीदारांनीही वज्रमुठ आवळली. दरम्यान गेवराईतील बुडित निघालेल्या छत्रपती मल्टिस्टेटचे चेअरमन व संचालक आरोपींना अद्याप अटक का होत नाही. हे आरोपी अजुनही फरार कसे असा संतप्त सवाल ठेवीदारांनी उपस्थित केला. बुडीत निघालेल्या ज्ञानराधा, साईराम, राजस्थानी, माँसाहेब जिजाऊ, मल्टिस्टेटसह इतर पतसंस्था व मल्टिस्टेटमधील ठेवी तात्काळ परत मिळाव्यात, जप्त केलेल्या मालमत्तांचा त्वरित लिलाव करण्यात यावा, या प्रमुख मागण्यांसाठी २४ फेब्रुवारी रोजी मुंबईत ठेवीदारांचा मोर्चा आयोजित करण्यात आला आहे. मोर्चाच्या नियोजनासह ठेवीदारांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी प्रा.उबाळे यांच्या मार्गदर्शनाखाली मराठवाड्यात शाखानिहाय बैठका सुरू आहेत. काही दिवसांपूर्वी परळी व माजलगाव येथेही बैठका घेण्यात आल्या होत्या. त्यानंतर शनिवारी भोकरदन व जाफराबाद येथे बैठका पार पडल्या. रविवारी गेवराईमध्ये झालेल्या बैठकीला ठेवीदारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## २० फेब्रुवारीला राज्यातील ग्रामपंचायती बंद!

मुंबई दि.१६ (प्रतिनिधी):- महाराष्ट्रातील सर्व ग्रामपंचायती संबंधित महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. राज्यातील सर्व ग्रामपंचायती शुक्रवारी २० फेब्रुवारीला बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. विविध मागण्यांसाठी हा राज्यव्यापी आंदोलन करण्याचा इशारा अखिल भारतीय सरपंच परिषदेकडून देण्यात आला आहे. राज्यातील १६ हजारांपेक्षा अधिक ग्रामपंचायतींची मुदत संपल्यामुळे सध्या त्या ठिकाणी शासकीय अधिका-यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. या राज्यव्यापी आंदोलनामागे महत्त्वाचे कारण म्हणजे, कार्यकाळ संपलेल्या ग्रामपंचायतींच्या तत्काळ निवडणुका घ्याव्यात. प्रलंबित ग्रामपंचायतीच्या निवडणुका होत नाहीत तोपर्यंत प्रशासक म्हणून सरपंचांची नियुक्ती करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

पान ६ वरून

## अवघ्या २८ दिवसात परिस्थिती जैसे थे

आर्थिक, शारीरिक, मानसिक पिळवणूक थांबवावी ही विनंती चाणक्य सामाजिक प्रतिष्ठान चे अध्यक्ष, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार प्रमोद पुसरेकर यांनी केली नगर परिषद मुख्याधिकारी शैलेश फडसे यांना ५ डिसेंबर २०२५ रोजी निवेदनाद्वारे केली. या बाबत अनेकदा पाठपुरावा केल्या नंतर १७ डिसेंबर २०२५ रोजी अतिक्रमणे काढण्याची तसदी घेण्यात येऊन ही अतिकमने काढण्यात आली. केंद्रीय कार्यालय असणाऱ्या पोस्ट ऑफिस च्या भिंतीवर स्पष्ट अक्षरात अतिक्रमणे करू नयेत केल्यास कार्यवाही करून गुन्हे दाखल करण्यात येतील असे नमूद केले असतानाही या ठिकाणी पुन्हा कोणत्याच आदेशाला न जुमानता अवघ्या २८ दिवसात नगर परिषद प्रशासनाच्या नाकावर टिच्चून अतिक्रमणे करण्यात आली आहेत. त्या मुळे नगर परिषद प्रशासनाचा कोणता धाक अथवा जरब या लोकांना नाही हे लक्षात येते.लवकरात लवकर ही अतिक्रमण न काढल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

## माजलगावात गाडीला कट का मारला?

चव्हाण व लक्ष्मण शिंदे सर्व रा. वडारवाडा माजलगाव यांच्याविरुद्ध ॲट्रॉसिटी ॲक्ट व जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील पाचही आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले असून या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपअधीक्षक अनिल कटके व सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रल्हाद मुंडे हे करत आहेत.

## माजलगाव येथे मंगलनाथ मंदिरात शिव महापुराण कथेची सांगता

परिसरात 'हर हर महादेव'च्या जयघोषाने वातावरण दुमदुमून गेले आहे.शिव महापुराण कथेचा लाभ घ्यावा, तसेच सांगता सोहळ्यास उपस्थित राहून आध्यात्मिक समाधान प्राप्त करावे, असे आवाहन सौ. यशोदा ज्ञानेश्वर जाधव यांनी केले आहे. मंगलनाथ यात्रा महोत्सवाच्या माध्यमातून धार्मिक परंपरा जपण्याबरोबरच समाजात सद्भावना, संस्कार आणि एकात्मतेचा संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.एकूणच, मंगलनाथ मंदिरातील शिव महापुराण कथा महोत्सवामुळे माजलगाव शहरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले असून, हा सोहळा भाविकांसाठी आध्यात्मिक पर्वणी ठरत आहे.

## निळकंठ शेजुळ यांचे निधन

दिनांक १६ फेब्रुवारी रोजी सकाळी दहा वाजता खरात आडगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले निळकंठच्या निधनामुळे गावात व सर्वत्र शोक काळा पसरले आहे त्याच्या पक्षात आई-वडील एक भाऊ पत्नी दोन बहिणी असा मोठा परिवार आहे शेजुळ परिवाराच्या दुःखात दैनिक पार्श्वभूमी परिवार सहभागी आहे.

## बीड जिल्ह्यातील तरुण बिल्डर्स पनवेलमध्ये

उपलब्ध करेल. दुसरे संचालक काझी रफी यांच्या कुटुंबातील सदस्य काझी मखदूम यांनी सांगितले की, बीड जिल्ह्यातील हिंदू-मुस्लिम तरुणांनी स्थापन केलेली ही फर्म सांप्रदायिक सौहार्द आणि एकतेची मिसाल आहे, जी राज्यातील तरुणांना नवीन उत्साह देईल. ते म्हणाले की, बीडचा अर्थ पाणी आहे आणि पनवेलचा अर्थही पाणी आहे, आणि हे मिलन केवळ संयोग नाही तर प्रेमाच्या गोड नदीकडे एक पाऊल आहे.या कार्यक्रमात कस्टम कमिश्नर शेख सलमान (खठड), ठाणे पोलिस अधीक्षक शिवराज सर, जीएसटीच्या डेप्युटी कमिश्नर नेहा निकम, मुंबईचे जिल्हा व सत्र न्यायाधीश सय्यद लईक हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. याशिवाय अतुल सेठ घर्ट, विशाल बड़े (कॉर्पोरेटर मुंबई), संचालक नूरुल इस्लाम, जमीळ भाई, अजान काझी, जावेद इकबाल, काझी तकीउद्दीन, कमर नाझ, वकार कादरी यांच्यासह मोठ्या संख्येने स्थानिक बिल्डर्स आणि मान्यवर नागरिक उपस्थित होते.

## बीडकरांच्या सेवेत कामधेनू आयुर्वेदिक चिकित्सालय

होल्डेज होम/ आयुर्वेसिक रिसॉर्ट या नव्या उपक्रमाचा प्रारंभ केला जात आहे. कामधेनू आरोग्यधाम व आयुर्वेदिक रिसॉर्ट मोरेश्वर देवस्थानजवळ, कोळवाडी, ता. जि. बीड तर कामधेनू आयुर्वेदिक चिकित्सालय हे बीड शहरातील पारनेरकर सभागृहाच्या जवळ, नाट्यगृह रोड, बीड या ठिकाणी सुरू केले जाणार आहे. याचा शुभारंभ श्रीगुरु चैतन्यमहाराज देगलूरकर (पंढरपूर) यांच्या हस्ते बुधवार, दि.१८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वा संपन्न होत आहे.बीडकरांनी या कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन मंजुषा व श्रीनिवास कुलकर्णी, गार्गी व सुमित कुलकर्णी, डॉ. अरविंद श्रीनिवास कुलकर्णी व कामधेनू परिवार च्या वतीने करण्यात आले आहे. कमधेनू समूह ची वाटचाल
कामधेनू भोजनालय स्टेडियम रोड, बीड : ३६ वर्षे ( १९९० ), कामधेनू अतिथ्य सहयोगनगर, बीड : २१ वर्षे ( २००७)
कामधेनू आरोग्यधाम व गोशाळा कोळवाडी, ता. जि. बीड : १६ वर्षे ( २०११ ), आवर्तन आर्किटेक्टस् सारडा सेंट्रल, डि.पी. रोड, बीड : ५ वर्षे ( २०२१ ), कामधेनू आरोग्यधाम व आयुर्वेदिक रिसॉर्ट मोरेश्वर देवस्थानजवळ, कोळवाडी, ता. जि. बीड : १८ फेब्रुवारी २०२६, कामधेनू आयुर्वेदिक चिकित्सालय, पारनेरकर सभागृहाच्या जवळ, नाट्यगृह रोड, बीड. १८ फेब्रुवारी २०२६

## प्रशासक काळात पाणीपुरवठा टेंडरात करोंडांचा भ्रष्टाचार

झालेल्या कामांची चौकशी करणे जरुरी असुन पाणीपुरवठा टेंडर, स्वच्छता टेंडर, सिमेंट रस्ते व अन्य टेंडरांची चौकशी करण्यात यावे नसता लोकशाही मार्गाने नगरपरिषद कार्यालय समोर आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा सामाजिक कार्यकर्ता रशिद शेख यांनी दिला आहे.

## चिंतेश्वर पाणपोईचे उद्घाटन शिवराज पवार यांच्या हस्ते संपन्न

रवी दाभाडे, बाबा वाघमारे, गणेश भुते, नारायण जगताप, नारायण मुलुक, माजी नगरसेवक शाम काका येवले,राजेंद्र मोटे ,रमेश मोटे, प्रेम मोटे, राहुल भैया मोटे, भाऊसाहेब नाना दाभाडे, अशोकरावजी मडकर, शिवाजीराव लिंगशे,अक्षय आंभाईक कर, रवी मडके, आदी मंडळी उपस्थित होते

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक गंमत भंडारी यांनी शाम प्रिंटर्स, नवी भाजी मंडई बीड येथे छापून पार्श्वभूमी कार्यालय, नवी भाजी मंडई रोड, बीड येथे प्रकाशित केले. फोन नं. (०२४४२) २३०१०१.
AR/TECH/Regd. N.P./34/Beed/99-2000 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 E-mail Address-parshvabhoomi@gmail.com

# पार्श्वभूमी

दिनांक १७ फेब्रुवारी २०२६ पान - ३


## संत सेवालाल महाराजांनी समता, बंधूत्वाची शिकवण दिली -डॉ. वसुदेवबप्पा गायकवाड

केज दि १६(प्रतिनिधी)- -संत सेवालाल महाराज हे संत असण्याबरोबरच थोर सेनानीही होते असे प्रतिपादन डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले. २५० वर्षापूर्वी त्यांनी स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वाची शिकवण समाजाला दिली होती, तसेच दिल्लीचा नवाब गुलाब खान मोहंमद खान याच्याशी लढाईही केली होती व मर्दुमकी गाजवत विजयही मिळवला होता. म्हणून सेवालाल महाराज हे संत असण्या बरोबरच थोर सेनानीही होते असे प्रतिपादन अध्यक्षीय समारोप प्रसंगी डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले.

## संस्कारच्या चिमुकल्यांनी घेतला रेल्वेमधुन प्रवासाचा आनंद

बीड दि १६ (प्रतिनिधी) येथील संस्कार विद्यालयातील इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांनी क्षेत्रभेटीच्या निमित्ताने बीड ते राजुरी रेल्वेत बसण्याचा मनमुराद आनंद लुटला . यावेळी विद्यार्थ्यांचा उत्साह, आनंद मनाला प्रसन्न करून जाणारा होता. या प्रवासादरम्यान मंगलमूर्ती मोरया, नारायणगड भगवान की जय, शालेय कविता, विविध गीत गायनातून बीडची रल्वे भक्तिमय झाली होती. चिमुकल्यांच्या आवाजाने दणाणून गेली होती .दिनांक १३ फेब्रुवारी२०२६ रोजी ही क्षेत्रभेट संपन्न झाली .या क्षेत्रभेटीमध्ये विद्यार्थ्यांनी गणपतीचे दर्शन करून नवगण राजुरीचे धार्मिक महत्त्व समजावून घेतले. नारायणगडावर पांडुरंगाचे दर्शन घेऊन अभंगावर नृत्य करुन स्नेहभोजनाचा आनंद घेतला.

# बीड-परळी रोडचे काम म्हणजे रोगापेक्षा ईलाज भयंकर असेच-राहुल डावकर

बीड दि १६ (प्रतिनिधी)- नागरिकांच्या सुविधेसाठी बीड परळी रोडचे काम जरी हातात घेण्याचे घेतले असले, तरीही या गुत्तेदाराच्या गलथान कारभारामुळे नागरिकांचे अपघात आणि



नागरिकांच्या नाकात तोंडात फुकट्याचे लोटच्या लोट जात आहेत. आठ-आठ महिने रस्ते खोदून ठेवलेले आहेत. वास्तविक पाहता जिथे तात्काळ कामाची सुरुवात करायची आहे तेवढाच रस्ता खोदणे योग्य ठरले असते. त्यामुळे नागरिकांना नाकातोंडात प्रमाणापेक्षा जास्त धूळ गेल्यामुळे श्वसनाशी संबंधित गंभीर आजाराची लागण होत आहे. त्यामुळे बीड परळी रोडचे काम म्हणजे रोगापेक्षा इलाज भयंकर असे म्हणण्याची वेळ आल्याचे संभाजी ब्रिगेडचे बीड तालुका अध्यक्ष राहुल डावकर यांनी नमूद केले.

पुढे नमूद केले की गुत्तेदाराने रस्त्याचे काम करताना त्यावरील खड्डे आणि मोठमोठाले दगड रोलर ने प्रेस करणं गरजेचं असतं. पण कसल्याही प्रकारची काळजी न घेता बीड परळी रोडचे गुत्तेदार नागरिकांच्या जीवाशी खेळ खेळत आहेत. रस्त्याचे काम चालू असताना टँकरने पाणी मारल्यास अजिबात धूळ उडत नाही. परंतु गुत्तेदार याकडेच सपशेल दुर्लक्ष करत आहे. आणि हुकून चुकून कधी पाणी मारलेच तर अतिशय चिखल करतात. त्यामुळे स्लीप होऊन अनेक मोटरसायकलस्वार पडलेले आहेत. वेळीच गुत्तेदारांनी दखल न घेतल्यास बीड परळी रोडवर रहदारी करणाऱ्या नागरिकांच्या रोशास त्यांना सामोरे जावे लागेल. या त्रासामुळे बीड परळी रस्त्याचे काम म्हणजे रोगापेक्षा ईलाज भयंकर वाटत आहे. याची योग्य ती दखल न घेतल्यास संभाजी ब्रिगेड तर्फे तीव्र आंदोलन छेडण्यात येईल आणि याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील. असा इशारा राहुल डावकर तालुका अध्यक्ष संभाजी ब्रिगेड बीड यांनी प्रसिद्धी पत्रकातून दिला आहे.

## "मला वाचवा मी गोरगरिबांची तहाण भागवणेसाठी उभी असलेली टाकी आहे!"

बीड दि १६ (प्रतिनिधी) -''मला वाचवा मी स्वर्गीय विनायक मेटे साहेबांच्या फंडातून गोरगरिबांच्या पिण्याच्या पाण्यासाठी बांधलेली टाकी आहे'' अशी जणू आर्त हाक बीड शहरातील सिटी हॉटेलच्या बाजूला उभी असलेली पाण्याची टाकी देत आहे.

शिवसंग्राम पक्षाचे संस्थापक, स्व. आमदार विनायकराव मेटे यांच्या निधीतून गोरगरिबांना स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे या उदात्त हेतूने ही टाकी उभारण्यात आली होती. अनेक वर्षांपासून या टाकीमुळे परिसरातील रिक्षाचालक, कामगार, प्रवासी, फेरीवाले आणि गरजू नागरिकांची तहान भागत आहे. उन्हाच्या कडाक्यात ही टाकी अनेकांसाठी जीवनदायी ठरली आहे.मात्र, काही अज्ञात व्यक्तींकडून ही टाकी जाणूनबुजून हळूहळू तोडण्याचा प्रयत्न सुरू असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. दररोज थोडे-थोडे नुकसान करून ही सामाजिक उपक्रमातून उभी राहिलेली जीवनवाहिनीच संपवण्याचा प्रयत्न होत असल्याने नागरिकांत संतापाची लाट उसळली आहे.

याबाबत सामाजिक कार्यकर्ते शेख युनूस यांनी तीव्र शब्दांत प्रतिक्रिया देत प्रशासन, नगरपरिषद आणि शिवसंग्राम पक्षाच्या अध्यक्षा श्रीमती ज्योतीताई मेटे यांना भावनिक आवाहन केले आहे. ''उन्हाळा जवळ येत आहे. अशा वेळी गोरगरिबांना पाण्याचा आधार असलेली ही टाकी वाचवणे अत्यंत गरजेचे आहे. स्व. विनायक मेटे साहेबांनी जनतेच्या हितासाठी उभारलेली ही योजना टिकवणे हे आपले कर्तव्य आहे,'' असे त्यांनी सांगितले.स्थानिक नागरिकांनीही या घटनेकडे गांभीर्याने पाहून संबंधितांवर कारवाई करावी आणि टाकीची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी केली आहे. ही टाकी केवळ सिमेंट आणि लोखंडाची रचना नसून, ती स्व. विनायक मेटे साहेबांच्या समाजसेवेची साक्ष असल्याचे शेख युनूस यांनी प्रसिद्धी पत्रकात नमूद केले

## ढेकणमोहा तांडा येथे संत सेवालाल महाराज यांची जयंती उत्साहात साजरी



ढेकणमोहा दि १६ (प्रतिनिधी)-बीड तालुक्यातील ढेकणमोहा तांडा येथे बंजारा समाजाचे आद्यदैवत, थोर तत्वज्ञ, महान विचारवंत, समाजसुधारक श्री संत सेवालाल महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. यां प्रसंगी संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार पिपळनेर पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मधुसूदन घुगे यांच्या हस्ते अर्पण करण्यात आला. यावेळी चंदकांत फड, भाऊराव नाना सुरवसे, डॉ. अमोल घुमरे सर, उद्धव दादा म्हेत्रे, बाबासाहेब काळे, नागेश शिंदे, विष्णू पवार ढेकणमोहा तांडा, साहेबराव पवार , दयाराम पवार सरपंच, गोवर्धन पवार बाजीराव पवार, भागवत खाकरे, अविनाश गवळी, नवनाथ धुमाळ, युवा नेते कैलास पवार, बाजीराव पवार, ,, नवनाथ आडे, देवीदास पवार, हरिभाऊ पवार, एकनाथ आडे, सुभाष आडे, रघुनाथ पवार, सुभाष पवार, शेषेराव पवार, नवनाथ नाथा पवार, धनु पवार, यादव पवार, सखुबाई पवार, मथुराबाई पवार, सुंदराबाई पवार, राधाबाई पवार, तुळसाबाई पवार, यशोदा पवार आदी मान्यवर व ग्रामस्थ, महीला, पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अभिजीत अर्जुन पायके यांची ऑल इंडिया पँथर सेनेच्या युवा तालुकाध्यक्ष पदी निवड

वडवणी दि १६(प्रतिनिधी)- शिवाजी चौक वडवणी येथे पदाधिकारी निवडी संदर्भात झालेल्या कार्यक्रमात अभिजीत अर्जुन पायके यांची ऑल इंडिया पँथर सेनेच्या वडवणी युवा तालुकाध्यक्ष निवड करण्यात आली या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे . या कार्यक्रमाला संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष समाजभूषण दिपक केदार तसेच महाराष्ट्र प्रवक्ता तथा बीड जिल्ह्याअध्यक्ष नितीन सोनवणे यांची प्रमुख उपस्थित होते
त्यांचे हस्ते अभिजित पायके यांना निवडीचे पत्र प्रदान करण्यात आले



यावेळी उपस्थित वडवणी तालूका अध्यक्ष त्र्यंबक पायके आणि इतर मान्यवरांनी अभिजीत पायके यांना शुभेच्छा देत संघटना बळकट करण्यासाठी आणि युवकांच्या प्रश्नांसाठी सक्रियपणे काम करण्याचा विश्वास व्यक्त केला . कार्यक्रमास संघटनेचे पदाधिकारी , कार्यकर्ते व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उद्योजक हरिभाऊ लगड यांचा पिंपरखेड जि.प.शाळेला देणार प्रिंटर व कॉम्प्युटर



आंभोरा दि १६ (प्रतिनिधी)- आष्टी तालुक्यातील हिवरा गावचे भूमिपुत्र व पुणे येथील उद्योजक हरिभाऊ लगड यांनी सामाजिक बांधिलकी जपत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पिंपळखेड येथे स्वखर्चातून प्रिंटर भेट देत विद्यार्थ्यांच्या शिक्षणात मोलाची भर घातली. याच कार्यक्रमात त्यांनी शाळेसाठी कॉम्प्युटर देण्याची घोषणाही केली

आजच्या डिजिटल युगात प्रिंटर व कॉम्प्युटरसारखी साधने शाळेसाठी अत्यंत आवश्यक असून, या सुविधांमुळे विद्यार्थ्यांना प्रकल्प, अभ्यासक्रम व विविध शैक्षणिक उपक्रम अधिक प्रभावीपणे करता येणार आहेत.या दातृत्वपूर्ण कार्याबद्दल शाळेच्या वतीने हरिभाऊ लगड यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शिक्षण समितीचे अध्यक्ष महादेव चव्हाण उपाध्यक्ष अंकुश आढागळे, शालेय शिक्षण समितीचे सदस्य सुरेश औटे, मुख्याध्यापक असलम शेख,सर अतुल चव्हाण सर, महादेव आमले सर, सतीश एकशिंगे सर आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात बोलताना उपस्थितांनी सांगितले की, ''ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, यासाठी अशा दानशूर व्यक्तिमत्त्वांचा हातभार अत्यंत महत्त्वाचा आहे. हरिभाऊ लगड यांचा हा उपक्रम इतर उद्योजकांसाठीही निश्चितच प्रेरणादायी ठरेल.शाळा प्रशासनाच्या वतीने त्यांच्या सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार मानण्यात आले.

# महाशिवरात्री निमित्त गेवराई येथील चिंतेश्वराचे हजारो भाविकांनी घेतले दर्शन

गेवराई दि.१६ (प्रतिनिधी) - महाशिवरात्रीचा उत्सव रविवारी मोठया उत्साहात आणि भक्तीभावाने साजरा करण्यात आला. पहाटेपासूनच विविध शिवमंदिरांमध्ये भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. गेवराई तालुक्यातील मन्यारवाडी रस्त्यावरील प्राचीन चिंतेश्वर मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त शनिवारी मध्यरात्रीपासूनच भाविकांची अलोट गर्दी पाहायला मिळाली. सुमारे ४० ते ५० हजार भाविकांनी रविवारी दर्शनाचा लाभ घेतला.
शिवभक्तांनी गोदावरी नदीच्या पात्रातून कावडीने पाणी आणून देवाला अभिषेक केला. महिलांनी शिवरात्र वाती पेटवून शिवलीलामृताचे वाचन केले. गेवराई (बीड) येथील पुरातन चिंतेश्वर मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त भाविकांची दर्शनासाठी मोठी गर्दी उसळली होती. पहाटेपासूनच हजारो भक्तांनी लांबच लांब रांगा लावून महादेवाला जलाभिषेक व बेल अर्पण केले. हर हर महादेवच्या जयघोषाने मंदिर परिसर दुमदुमून गेला होता. महिलांनी शिवरात्र वाती पेटवून धार्मिक विधी पूर्ण केला. गेवराई तालुक्यातील अनेक ठिकाणी असलेल्या शिवमंदिरात भाविकांची मांदियाळी पहावयास मिळाली.

## अंबाजोगाई मधुमेह तज्ञ डॉ.अतुल शिंदे यांना डायबिटीज इंडिया संस्थेचा अवार्ड २०२६ प्रदान



अंबाजोगाई दि १६. (प्रतिनिधी)-अंबाजोगाई शहरात गेल्या १३ वर्षापासून अखंडित व अविरतपणे मधुमेही रुग्णांची सेवा करणाऱ्या डॉ. अतुल शिंदे यांना राष्ट्रीय स्तरावर मधुमेही रुग्णांसाठी काम करणाऱ्या डायबिटीज इंडिया संस्थेच्या वतीने १३ फेब्रुवारी २०२० रोजी हैदराबाद येथे झालेल्या कार्यक्रमात राष्ट्रीय स्तरावरील डायबिटीज अवेरनेस इनिशिएटिव अवॉर्ड - २०२६ नुकताच जाहीर करण्यात आला .

डॉ.अतुल शिंदे यांनी १३ वर्षांपूर्वी वैद्यकीय शिक्षण घेऊन अंबाजोगाई शहरातील प्रशांत नगर भागात योगेश्वरी डायबिटीज केअर सेंटर या नावाने पायाभरणी केली. १३ वर्षाची अखंड मेहनत व मधुमेही रुग्णांना सातत्याने केलेले समुपदेशन यामुळे रुग्णांमध्ये मधुमेह रोखण्यात मोठ्या प्रमाणात यश आले.डॉ.अतुल शिंदे हे केवळ एवढ्यावर थांबले नाहीत तर दरवर्षी मधुमेह दिनानिमित्ताने अंबाजोगाई तालुका व परिसरातील जे गोरगरीब व मध्यमवर्गीय रुग्ण आहेत त्यांच्यासाठी मोफत रक्त तपासणी, मोफत उपचार आणि मोफत औषधी दिली जातात.वैद्यकीय सेवेसोबतच निस्वार्थपणे गरीब रुग्णांना मोफत सेवा ते देत असतात. मधुमेहाच्या बाबतीत राष्ट्रीय स्तरावर काम करणाऱ्या डायबेटीज इंडिया या संस्थेने डॉ.अतुल शिंदे यांच्या निस्वार्थ कार्याचा अभ्यास करून त्यांना राष्ट्रीय स्तरावरचा डायबिटीज अवेरनेस इनिशिएटिव अवॉर्ड - २०२६ नुकताच जाहीर केल्यानंतर त्याचे शुक्रवार दि.१३ फेब्रुवारी २०२६ रोजी हैदराबाद येथे डॉ.शशांक जोशी व आंतरराष्ट्रीय डायबेटीज फेडरेशनच्या अध्यक्ष डॉ.निती पॉल यांच्या हस्ते अवॉर्ड प्रदान करण्यात आला. याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# बचपन इंग्लिश स्कूल बीड येथे चिमुकल्यांचे स्नेहसंमेलन उत्साहात

बीड दि १६ (प्रतिनिधी)- शहरातील तुळजाभवानी चौक येथील बचपन इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन शुक्रवार दिनांक १३ फेब्रुवारी रोजी मोठ्या उत्साहात पार पडले. यावेळी विविध गाण्यावर नृत्य करत बालकलाकारांनी उपस्थित पालक वर्गासह प्रमुख पाहुण्यांची दाद मिळवली.
या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून एपीआय बाळराजे भागवत दराडे व अध्यक्षपदी शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पिआय बांगर प्रविणकुमार यांची विशेष उपस्थिती होती. तसेच कार्यक्रमाला प्रसिद्ध गायिका सौ. शुंभागी केदार वनवे यांची विशेष उपस्थिती लाभली . कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन व सरस्वती मातेच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली प्रमुख पाहुण्यांचे स्वागत सौ भाग्यश्री गोविंदराव वनवे, शाळेच्या समन्वयक सौ किरण राहुल वनवे, मॅडम



प्राचार्य श्रीमती राजश्री बागलाने मॅडम ,लोकसेवा नर्सिंग कॉलेजच्या प्राचार्या डॉ सौ सुरभी मॅडम यांनी केले. यानंतर प्रमुख पाहुण्यांनी त्यांचे मनोगत व्यक्त करून बचपन इंग्लिश स्कूलचे छोटेसे रोपटे वनवे परिवाराने लावले असून त्याचे लवकरच वटवृक्षात रूपांतर व्हावे अशा सदिच्छा देऊन मॅनेजमेंटचे तोंड भरून कौतुक केले. यानंतर बचपन स्कूलच्या छोट्या छोट्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी बहारदार नृत्य व कसरती करून प्रमुख पाहुणे व आलेल्या पालकांचे व प्रेक्षकांचे मने जिंकली आणि शेवटी या चिमुकल्यांनी बचपन प्ले स्कूलचा अर्थ दर्शविणारी अतिशय सुंदर अशी थीम सादर केली कार्यक्रमाच्या शेवटी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते चिमुकल्यांचा गोल्ड मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला या कार्यक्रमाला पालकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती हा कार्यक्रम यशस्वी पणे पार पाडण्यासाठी सौ. मंगल भोगे सौ स्मिता अबुज सौ रचना मुंडे तसेच सर्व शिक्षक वर्ग शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन कुमारी राजश्री निटुरकर यांनी केले . इतका नियोजनबद्ध व चांगल्या पद्धतीने कार्यक्रम सादर केल्यामुळे विद्यार्थीपालकाने स्कूल मॅनेजमेंट चे तोंड भरून कौतुक केले शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली...

## आंतरराष्ट्रीय लेक्रोस खेळामध्ये कु.साक्षी कराडचा डंका, सुवर्णपदक पटकावत भारताने उडविला पाकचा धुव्वा

केज दि १६(प्रतिनिधी) केज येथील साने गुरुजी निवासी विद्यालयाची विद्यार्थिनी कु. साक्षी उद्धवराव कराड ने दि.१ ते ४ फेब्रुवारी २०२६ या दरम्यान सऊदी अरेबिया ची राजधानी रियाद येथे पार पडलेल्या आशियाई लेक्रोस स्पर्धेत भारतीय संघाने ऐतिहासिक कामगिरी नोंदवली आहे. अंतिम सामन्यात पाकिस्तान चा २२.०५असा धुव्वा उडवत भारतीय महिला संघाने सुवर्णपदकावर आपले नाव कोरले.

या विजयी संघात केजची कन्या कु. साक्षी उद्धवराव कराड याने इन मध्ये खेळुन उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करून या विजयात मोलाचा वाटा उचलला आहे. तिच्या या सुवर्ण यशाचे क्रीडा प्रेमींकडुन भरभरून कौतुक होत आहे. विशेष म्हणजे भारतीय क्रीडा इतिहासात प्रथमच महिला आणि पुरुष आशा दोन्ही लेक्रोस संघांनी एकाच वेळी सुवर्णपदक मिळवून इतिहास निर्माण केला आहे. या विजया मुळे महिला व पुरुष या दोन्ही लेक्रोस संघाना २०२८च्या ऑलंपिक मध्ये लेक्रोस खेळाचा समावेश असल्याने भारताचा हा विजय महत्त्वपूर्ण मानला जात आहे. या यशाबद्दल कु. साक्षी कराड चे भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे सरचिटणीस आदित्य दादा पाटील, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष राहुल भैय्या सोनवणे, युवा नेते पशुपतीनाथ दांगट, संस्थेचे अध्यक्ष अँड. उद्धवराव कराड, उपाध्यक्षराजेश कापसे, संकुल प्राचार्या डॉ. कविता कराड, प्रविण कुमार शेप, प्रताप मोरे सर, बाळासाहेब ठोंबरे, संगिता साळवे, साने गुरुजी निवासी विद्यालय केज परिवारातील सर्व सदस्यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# स्वामी विवेकानंद शाळेत करियर गाईडन्स कार्यक्रम संपन्न

केज दि १६ (प्रतिनिधी) - येथीलस्वामी विवेकानंद विद्यामंदिर माध्यमिक विभाग या शाळेमध्ये इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप तसेच, शिक्षक पालक मेळावा या कार्यक्रमाबरोबरच करियर गाईडन्स हा तिहेरी कार्यक्रम संपन्न झाला.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्था अध्यक्ष अंकुशराव इंगळे, तर प्रमुख पाहुणे म्हणून अहिल्यानगर येथील सच्चिदानंद घोणसे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस उपस्थित मान्यवरांचे स्वागत स्वागत गीताने झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय संस्थेचे सचिव जी.बी. गदळे यांनी दिला .तर दहावीतील आकांक्षा सांजूरे, आकांक्षा करपे, ऐश्वर्या घुले, अनुष्का वाळके या विद्यार्थ्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या शाळेतील शिक्षकांच्या वतीने दत्ता सत्वधर सर यांनी दहावी च्या उपस्थित विद्यार्थ्यांना भविष्यातील आपली दिशा कशी असावी याविषयीचे मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुणे प्रा. सच्चिदानंद घोणसे यांप्रसंगी बोलताना माझे शिक्षण देखील अत्यंत खडतर परिस्थिती मध्ये झाले असल्याचे नमूद करून पालकांनी आपल्या इच्छा आकांक्षा पाल्यावर लादू नयेत. त्यांना त्यांच्या क्षमते नुसार करिअर घडविण्याची संधी उपलब्ध करून द्यावी असे आवाहन केले . प्रा. शिनगारे सर याप्रसंगी बोलताना , अॅकॅडमीच्या अॅकॅडमीच्या नियोजनाची रूपरेषा ही उपस्थित पालकांपुढे मांडली.तर अध्यक्षीय समारोपात अंकुशराव इंगळे यांनी या शाळेतील विद्यार्थी दहावी बोर्डाच्या परीक्षेमध्ये सर्वाधिक गुण घेऊन आपल्या शाळेचे नावलौकिक करतात. त्याचा निश्चितच सार्थ अभिमान वाटतो. शिक्षकांनी घेतलेल्या कष्टाचे फळ, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेतून दिसून येते असे नमूद केले कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रबोधकांत समुद्रे यांनी केले तर आभार शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे यांनी मानले.

# शांती ब्रह्म भारती महाराजांच्या काल्याच्या कीर्तनाने बेलेश्वर संस्थानवरील महाशिवरात्र सोहळ्याची सांगता

लिंबागणेश दि १६ (प्रतिनिधी)- बीड तालुक्यातील बेलगाव येथील श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान येथे महाशिवरात्र महोत्सवानिमित्त दि.९ फेब्रुवारीपासून सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याची सांगता सोमवार दि.१६ रोजी शांती ब्रह्म तुकाराम भारती महाराज यांच्या सोश्राव्य अशा काल्याच्या कीर्तनाने भक्तिमय वातावरणात सांगता झाली.
यावेळी मोरेश्वर संस्थान कोळवाडी मठाधिपती हरिहर भारती महाराज,बबन महाराज मंझरीकर,भक्तिदास महाराज शिंदे ( बेलखंडी पाटोदा), रणजित महाराज शिंदे (नेकनुर) उपस्थित होते.कीर्तनादरम्यान त्यांनी संत तुकाराम महाराज यांचा तुझिये संगति! जाली आमुची निश्चिंति हा चार चरणी अभंग घेतला. या अभंगाच्या माध्यमातून गोपाळ आणि भगवंतातील गोड संवादाचे रसाळ वर्णन केले. दरम्यान या अखंड हरिनाम सप्ताह मध्ये बबन महाराज मंझरीकर (हवेली), रामहरी महाराज वायबसे (सावरगाव सोने), रामायणाचार्य एकनाथ महाराज गाडे (चकलंबा), रामकृष्ण महाराज रंधवे बापू (पाटोदा),




प्रेमानंद शास्त्री महाराज (वृंदावन धाम), भागवताचार्य शंकर महाराज चिंचकर (बीड) तसेच कृष्णा महाराज शास्त्री (हैनाही महाराज संस्थान, गुंदेफळ, बुलढाणा) यांनी कीर्तनसेवा दिली.महाशिवरात्र उत्सव कमिटी बेलगाव, बेलगाव तरुण मंडळ व विश्वस्त मंडळ यांच्या वतीने नियोजनबद्ध आयोजन करण्यात आले होते. काल्याच्या कीर्तनानंतर मोठ्या संख्येने पंचक्रोशीतील भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

# संपादकीय

## क्रांतिकारकांचे गुरू वस्ताद लहुजी साळवे

स्वातंत्र्य संग्रामातील एक जहाल क्रांतिकारक तसेच क्रांतिकारकांचे गुरू वस्ताद लहुजी साळवे यांचा स्मृतिदिन. भारतमातेला इंग्रजांच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी लाखो ज्ञात अज्ञात क्रांतिकारकांनी हौतात्म्य पत्करले त्यात वस्ताद लहुजी साळवे यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. वस्ताद लहुजी साळवे यांनी भारतमातेला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जे महान कार्य केले त्या कार्याची नोंद भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात सुवर्ण अक्षरांनी घ्यायला हवी होती मात्र दुर्दैवाने त्यांच्या कार्याची दखल इतिहासकरांनी घेतली नाही म्हणूनच त्यांच्या कार्याविषयी देशातील खूपच कमी लोकांना माहिती आहे. वस्ताद लहुजी साळवे यांचा जन्म १४ नोव्हेंबर १७९४ रोजी पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पेठ या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव राघोजी साळवे ( राऊत ) तर आईचे नाव विठाबाई असे होते. लहुजी साळवे यांचा जन्म शूरवीरांच्या घरात झाला. त्यांचे खापर पणजोबांवर शिवाजी महाराजांनी पुरंदर किल्ल्याच्या रक्षणाची जबाबदारी दिली होती. त्यांचे वडील राघोजी साळवे हे दुसऱ्या बाजीरावाच्या काळात शिकारखाना व शस्त्रगाराचे प्रमुख होते. लहुजींचे घराणे शूरवीर, लढवय्ये असल्याने लहुजीने देखील शूर बनावे अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती म्हणूनच त्यांनी लहुजींना लहानपणापासूनच शस्त्रांची आणि युद्ध कलेची तालीम दिली. त्यामुळे लहुजी घोडेस्वारी करणे, दांडपट्टा फिरवणे, भालाफेक करणे, बंदूक चालवणे, तोफगोळे फेकणे, गनिमीकावा करणे, शत्रूंची गुप्त माहिती गोळा करणे या युद्ध कलांत पारंगत झाले. ५ नोव्हेंबर १८९७ रोजी पेशव्यांचे इंग्रजांसोबत घनघोर युद्ध सुरू झाले. या युद्धात राघोजींसोबत तरुण लहुजीही सहभागी झाले. या युद्धात राघोजी लहुजी या बापलेकांनी प्रयत्नांची शर्थ केली मात्र या युद्धात राघोजींना वीरमरण आले. या युद्धात पेशव्यांचा पराभव झाला. वडिलांना वीरगती प्राप्त झाल्यावर लहुजींच्या हृदयात स्वातंत्र्य प्राप्तीची ज्वाला भडकली. भारतमातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी राघोजी साळवे शाहिद झाले त्या ठिकाणीच लहुजींनी १७ नोव्हेंबर १८१७ ला आपल्या वडिलांना श्रद्धांजली अर्पण करतना मरेन तर देशासाठी आणि जगेन तर देशासाठी अशी शपथ घेतली. इंग्रजांशी लढायचे असेल तर त्यासाठी जहालच व्हावे लागेल हे ओळखून त्यांनी तरुणांना जागृत केले. लहुजी साळवे यांनी पुण्यातील मुलांना युद्ध कलेचे शिक्षण देण्यासाठी पुण्यतिल रास्ता पेठेत देशातील पहिले तालीम युद्ध कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरू केले. या प्रशिक्षण केंद्रात सर्व समाजातील तरुण सहभागी झाले. १८३९ साली इंग्रजांनी सातारचे छत्रपती प्रतापसिंह यांना गादीवरून हटवले. छत्रपती प्रतापसिंह यांना पदच्युत केल्याने तरुणांमध्ये इंग्रजांविरुद्ध चीड निर्माण झाली. याचा वचपा काढण्यासाठी तात्या टोपे, नानासाहेब पेशवे यांनी महाराष्ट्रात तर उत्तरेत रंगोबापू यांनी लहुजींच्या मदतीने इंग्रजांविरुद्ध बंड पुकारले. १२ जून १८५७ ही बंडाची तारीख निश्चित करण्यात आली. मात्र बंडाची कुणकुण इंग्रजांना लागली व त्यांनी लहुजींसह अनेक क्रांतिकारकांना पकडले मात्र त्यामुळे इतर क्रांतिकारक चिडले व त्यांनी पुरंदरच्या मामलेदारांना ठार मारले. मामलेदारांच्या हत्येला जबाबदार ठरवून इंग्रजांनी कनय्या मांग व धर्मा मांग यांना तोफेच्या तोंडी दिले हे दोघेही लहुजीचे शिष्य होते. याच हत्येला जबाबदार ठरवून आणखी काही क्रांतिकारकांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. या क्रांतीकारकांना लहुजी साळवे यांनीच प्रशिक्षण दिले असा संशय असल्याने इंग्रजांनी लहुजी साळवे यांना अटक करण्यासाठी त्यांच्या पाठीमागे पोलिसांचा ससेमिरा लावला. पोलिसांचा ससेमिरा चुकवण्यासाठी लहुजी साळवे हे वेषांतर करून भ्रमंती करू लागले या काळात त्यांनी सातारा, पन्हाळा या ठिकाणच्या दुर्गम भागात प्रशिक्षण केंद्र उभारली. या प्रशिक्षण केंद्रातून त्यांनी अनेक क्रांतिकारक तयार केले. १७ फेब्रुवारी १८८१ रोजी पुण्यातील संगमपूरच्या परिसरात एका झोपडीवजा घरात लहुजींची प्राणज्योत मालवली आणि एका महान क्रांतीपर्वाचा शेवट झाला. भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी वस्ताद लहुजी साळवे शेवटच्या श्वासापर्यंत लढले आणि आपल्या सारखेच हजारो जहाल क्रांतिकारक निर्माण केले म्हणूनच त्यांना क्रांतिकरांचे गुरू असे म्हणतात. आज त्यांचा स्मृतिदिन मात्र आजही त्यांच्या कार्याची ओळख नव्या पिढीला नाही हे आपले दुर्दैव. अर्थात याला आपले इतिहासकार देखील तितकेच जबाबदार आहेत त्यांनी वस्ताद लहुजी साळवे यांचे कार्य आजच्या पिढीपर्यंत पोहचवले नाही.

# संतुलित खत धोरणामुळे देशाची माती संकटात

# अॅग्रो इनपुट डिलर्स असोसिएशनची पंतप्रधान मोदींना महत्त्वपूर्ण सूचना

नवी दिल्ली दि १६ (प्रतिनिधी)– देशातील सुमारे १४ कोटी शेतकरी कुटुंबे आणि कृषी क्षेत्राचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी 'अॅग्रो इनपुट डीलर्स असोसिएशन'ने केंद्र सरकारला खत अनुदान धोरणात (छइड) आमूलाग्र बदल करण्याचा प्रस्ताव पाठवला आहे. असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष मनमोहन कलंत्री यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून विनंती केली आहे की, सध्याच्या खत धोरणामध्ये युरिया आणि एनपिके च्या किमतींमधील वाढती तफावत कमी करणे अनिवार्य आहे.

मुख्य चिंता: युरियाचा अतिवापर आणि जमिनीचा पोत खालावणे :– कलंत्री यांनी नमूद केले की, सध्या युरिया (२६६/४५ किलो) आणि एनपिके (रू.२१००/५० किलो) यांच्या किमतीत मोठी तफावत आहे. यामुळे शेतकरी नाईलाजास्तव फक्त स्वस्त युरियाचा वापर करत आहेत. वैज्ञानिकदृष्ट्या, नत्राच्या (Nitrogen)अतिवापरामुळे जमिनीची आम्लता (Acidity) वाढत आहे, ज्यामुळे जमीन कडक होत आहे आणि तिची पाणी शोषण्याची क्षमता कमी होत आहे. हे भविष्यात देशाच्या अन्नसुरक्षेसाठी मोठे संकट ठरू शकते.यासाठी

सल्फर कोटेड युरिया (युरिया गोल्ड): सामान्य युरिया ऐवजी सल्फर कोटेड युरियाला रू.५०० प्रति ४० किलो दराने प्रोत्साहन दिले जावे. हे 'स्लो रिलीज' खत असून जमिनीचा पोत खराब होण्याचे प्रमाण ३०% पर्यंत कमी करते.

टप्प्याटप्प्याने उत्पादन: पुढील ५ वर्षांत सामान्य युरियाचे उत्पादन दरवर्षी २०% नी कमी करून त्याऐवजी प्रगत युरिया बाजारात आणला जावा.

सब्सिडीचे फेरवाटप: युरियावर वाचलेल्या अतिरिक्त अनुदानाचा (Subisdy) वापर NPK आणि DAP च्या किमती कमी (१३५० – १५००) करण्यासाठी केला जावा, जेणेकरून शेतकरी संतुलित पोषण (Balanced Nutrition) पद्धतीचा अवलंब करू शकतील.

एमआरपी चे निर्धारण: खत कंपन्यांकडून वेगवेगळ्या एमआरपी (MRP) ठेवल्या जात असल्याने शेतकरी संभ्रमात आहेत. सरकारने प्रत्येक ग्रेडची एमआरपी पुन्हा निश्चित करावी.

पंतप्रधानांच्या संकल्पनेला समर्थन– पंतप्रधान मोदींनी गेल्या १० वर्षांत चडझ खरेदीवर खर्च केलेले १९.६० लाख कोटी रुपये आणि 'किसान सन्मान निधी' अंतर्गत ३.७० लाख कोटी रुपयांच्या थेट लाभाचे कलंत्री यांनी कौतुक केले. ते म्हणाले की, पंतप्रधानांचे युरियाचा वापर कमी करण्याचे स्वप्न तेव्हाच साकार होईल जेव्हा इतर खतांच्या (NPK/MOP) किमती शेतकऱ्यांच्या आवाक्यात असतील. असोसिएशनने मागणी केली आहे की, पोटॅश (MOP) च्या किमतींवरही नियंत्रण ठेवले जावे जेणेकरून ऊस आणि इतर पिकांच्या उत्पादकतेवर परिणाम होणार नाही. या विषयावर सविस्तर चर्चा करण्यासाठी असोसिएशनने पंतप्रधान आणि रसायने व खत मंत्री जे.पी. नड्डा यांची भेट घेण्यासाठी वेळ मागितली आहे.असे प्रसिद्धी पत्रकात मनमोहन कलंत्री राष्ट्रीय अध्यक्ष, अॅग्रो इनपुट डीलर्स असोसिएशन, नवी दिल्ली. यांनी नमूद केले.

## अजमल अरेबिक अॅन्ड इंग्लिश स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या थाटात संपन्न



बीड दि १६(प्रतिनिधी)– येथील अजमल अँड अरेबिक इंग्लिश स्कूल येथे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात आणि हर्षउल्हासात साजरे करण्यात आले.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक मुफ्ती आसेफ साहब कास्मी यांनी कार्यक्रमाच्या यशासाठी विशेष प्रयत्न केले.

कार्यक्रमाला मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्य अतिथी म्हणून क्रांतिकारी शिक्षक संघटनेचे सचिव हाजी शाहिद कादरी सर उपस्थित होते.या वार्षिक स्नेहसंमेलणात जवळ जवळ १६० विद्यार्थ्यांनी आपले कला गुण नाटकाद्वारे अभिनया द्वारे सादर करून उपस्थित पाहुण्यांचे आणि पालकांचे मन जिंकले. कार्यक्रमाच्या यशासाठी शाळेचे शिक्षक कौसर मॅम, रझीया मॅम, दिलशाद मॅम मुन्नजा मॅम, सुमय्या मॅम, तसेच मौलाना नाजीम साहेब यांनी विध्यार्थी यांना मार्गदर्श केले. कार्यक्रमाचा शेवट मदरसा अनवारुल उलुम मलापुरी चे मुफ्ती अतिक साहेब यांनी दुआ करून केला.यावेळी शाळेच्या पालकांसहित अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यामध्ये युवा समाजसेवक पिंटू शेठ, राजू पटेल, मुजीब मौलाना तसेच नवाब पटेल सहित शाळेचे हितचिंतक यांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.

## महाशिवरात्रीनिमित्त दिंद्रुडच्या खोलेश्वर मंदिरात फराळ वाटप



दिंद्रुड दि.१६ (प्रतिनिधी)– प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी महाशिवरात्री दिवशी येथील खोलेश्वर तरुण मित्र मंडळाच्या वतीने माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील खोलेश्वर मंदिरात भाविकांना फराळाचे वाटप करण्यात आले आहे.

गेल्या पाच वर्षापासून अखंडितपणे ही सेवा चालू आहे. स्थानिक च्या सोशल मीडिया ग्रुपवर महाशिवरात्री निमित्त फराळाचे आयोजन करण्यात आले आहे, ज्यांना स्व:इच्छेने काही सहकार्य करायचे असेल त्यांनी करावे. असा मेसेज करताच व्यापारी, भावीक– भक्त व तरुणांनी आपापल्या परीने फराळासाठी सहकार्य केले. कोणी आर्थिक, कोणी साबुदाणा, शेंगदाणे,केळी आदी साहित्य दिले. प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी महाशिवरात्री दिवशी येथील खोलेश्वर तरुण मित्र मंडळाच्या वतीने माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील खोलेश्वर मंदिरात भाविकांना फराळाचे वाटप करण्यात आले आहे. गेल्या पाच वर्षापासून अखंडितपणे ही सेवा चालू आहे. स्थानिक च्या सोशल मीडिया ग्रुपवर महाशिवरात्री निमित्त फराळाचे आयोजन करण्यात आले आहे, ज्यांना स्व:इच्छेने काही सहकार्य करायचे असेल त्यांनी करावे. असा मेसेज करताच व्यापारी, भावीक– भक्त व तरुणांनी आपापल्या परीने फराळासाठी सहकार्य केले. कोणी आर्थिक, कोणी साबुदाणा, शेंगदाणे,केळी आदी साहित्य दिले. रविवार दि.पंधरा रोजी महाशिवरात्री उत्सवा मुळे मंदिरात महिला– पुरुष, आबाल,वृद्ध यांची भगवान खोलेश्वर यांच्या दर्शनासाठी गर्दी झाली होती. मंदिर व प्रांगणात भक्तीमय, उत्साही, आनंदाचे वातावरण झाले होते. दर्शनासाठी या ठिकाणी येणाऱ्या महिला–पुरुष,लहान मुलं–मुली या सर्वांना युवक मंडळी फराळाचे वाटप करण्याची मनोभावी सेवा करत होते. आलेल्या भाविक भक्तांसाठी फराळाबरोबरच जारच्या शुद्ध पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

## चनई ग्रामपंचायतीत बीड हायवेवर राजमाता जिजाऊंच्या पुतळ्याचे अनावरण

अंबाजोगाई दि १६ (प्रतिनिधी)–येथून जवळच असलेल्या चनई ग्रामपंचायतीच्या वतीने बीड हायवेवर राजमाता जिजाऊ यांच्या भव्य पुतळ्याची प्रतिष्ठापना करण्यात आली.

या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून शिवमती राधाताई रामदास सपकाळ जिजाऊ ब्रिगेड जिल्हाध्यक्ष बीड उपस्थित होत्या तसेच अनिल शिंदे चनई उपसरपंच ,प्रभाकर सावरे, सरपंच पती प्रवीण कदम, ग्रामपंचायत सदस्य यांच्यासह गावातील मान्यवर उपस्थित होते.यावेळी दत्ता भाऊ सावरे, गायकवाड मामा, विलास सावरे, विजय सावरे, निखिल कदम, बिरुदेव गोचडे तसेच इतर गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती. सर्वांच्या उपस्थितीत पुतळ्याचे पूजन व अभिवादन करण्यात आले. राजमाता जिजाऊंच्या कार्यातून प्रेरणा घेऊन समाजात आदर्श घडविण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन ग्रामपंचायत चनई व ग्रामस्थांच्या सहकार्याने



करण्यात आले.

## वैद्यनाथ महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींची कराटे स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी



परळी दि १६ (प्रतिनिधी)– परळी येथील वैद्यनाथ महाविद्यालयाच्या बी.एस्सी. तृतीय वर्षाच्या कु. अमृता मनोहर काळे व कु. वैष्णवी वैजनाथ जिगे यांनी २६ वी ऑल महाराष्ट्र ओपन कराटे चॅम्पियनशिप २०२६ या स्पर्धेत रौप्य पदक पटकावले.

ही स्पर्धा एशियन शितो रिव्ह स्पोर्ट्स कराटे डू असोसिएशन व मुंबई स्पोर्ट्स कराटे असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने पवई, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. राज्यभरातून मोठ्या संख्येने स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. अत्यंत चुरशीच्या सामन्यांमध्ये उत्कृष्ट कौशल्य, चिकाटी व आत्मविश्वासाच्या जोरावर दोन्ही विद्यार्थिनींनी रौप्य पदकावर आपले नाव कोरले.या उल्लेखनीय यशाबद्दल महाविद्यालया तर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी वैद्यनाथ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. व्ही. जगतकर, उपप्राचार्य डॉ. व्ही. बी. गायकवाड, प्रा. डी. के. आंधळे तसेच क्रीडा विभागाचे संचालक प्रा. डॉ. पी. एल. कराड , शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख प्रा. डॉ व्हि.व्हि. बेंडसुरे आणि प्रा. विजय मुंढे उपस्थित होते. प्राचार्य डॉ. जगतकर यांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन करत पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या व इतर विद्यार्थ्यांनीही त्यांच्या कामगिरीतून प्रेरणा घ्यावी, असे आवाहन केले.

## आहरण संवितरण अधिकाऱ्यांची कार्यशाळा निवृत्तीवेतनधारकांच्या अडचणीही सोडवणार

छत्रपती संभाजीनगर, दि.१६(जिमाका)– महालेखापाल लेखा व हकदारी, नागपूर व वरिष्ठ कोषागार कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांचे द्वारा (E-PPO) आणि निवृत्तीवेतन समाधान या नविन उपक्रमांबाबत माहिती देण्याकरिता सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांची बुधवार दि. १८ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेमध्ये (E-PPO) संदर्भात मार्गदर्शन करण्यात येणार असून सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांनी सकाळी ११ वा. उपस्थित राहावे. तसेच त्याच दिवशी दुपारी अडीच वा. छत्रपती संभाजीनगर कोषागार मार्फत निवृत्तीवेतन घेणाऱ्या निवृत्तीवेतनधारक कुटुंबनिवृत्तवेतन धारक यांच्या निवृत्तीवेतन संबधित अडीअडचणी जाणून घेऊन त्यांचे निराकरण करण्यासाठी PENSION–अदालत महालेखापाल लेखा व हकदारी, नागपूर व वरिष्ठ कोषागार कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांचे द्वारा आयोजित करण्यात येत आहे. निवृत्तीवेतन कुटूंब निवृत्ती वेतनधारकांच्या महालेखापालस्तरावरील असलेल्या अडीअडचणी परस्पर समन्वयाने सोडविण्यावर विशेषत्वाने भर दिला जाणार आहे. तरी संबंधितानी अभिलेख्यासह बुधवार दि. १८ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे दुपारी अडीच वा. उपस्थित राहणेबाबत आवाहन करण्यात येत आहे.

## महंत श्रीराम महाराज यांच्या कीर्तनाने विडा येथे महाशिवरात्र उत्सव संपन्न



केज दि १६( प्रतिनिधी)– एको देव : सर्वभूतेषु गुढ : सर्व व्यापी सर्वभूतान्तरामा या उपनिषदातील श्लोका नुसार ईश्वर हा एकच असून त्याची रूपे अनेक आहेत तसेच सर्व प्राणीमात्रामध्ये गुढ रूपाने वास्तव्य करत असल्याचे प्रतिपादन ह.भ.प महंत श्रीराम महाराज विडेकर यांनी केले. विडा येथे महाशिवरात्री निमीत्ताने आयोजित किर्तन सेवेत ते बोलत होतेज्ञानेश्वरादी सर्व संत हे विठ्ठल उपासक आहेत आणि या वारकरी संप्रदायाचे एक तत्व असून ते म्हणजे अनेकात्वांमध्ये एकत्व पाहणारा संप्रदाय आहे असे सांगितले या पर्व दिनानिमित्त त्यांनी या संत ज्ञानेश्वरांच्या ईश्वर रूपाचे वर्णन पर अभंग वर निरूपण करताना त्यांनी ज्याची साळोंखा स्वर्गाला भिडली आहे व खालच्या पिंडीने समुद्राचा ठाव घेतला आहे जो शेषा सारखे बैठक करून बसला आहे तसेच ब्रह्मानंदी मन अर्पण करून ज्योतिर्लिंग हृदयात धारण केले असे भगवान शंकराच्या रूपाचे वर्णन केले आहे याप्रसंगी ह.भ.प सखारामजी कदम महाराज,महिपती बुवा ह.भ.प आंधळे बंधू,बाळा निर्मळ,तुकारामजी पटाईत, बबनदादा पवार,बाबा वाघ या भजनी मंडळी सह ह.भ.प केशवबापु देशमुख, पांडुरंग पवार,बाबासाहेब भाऊ,बळीराम देसाई,नवनाथ काका,भालेकर फौजी, नारायण देवा,जगन्नाथ गुरुजी यांच्यासह बहुसंख्येने महिला व पुरुष भक्त मंडळी उपस्थित होते या कार्यक्रमाचे आयोजन बाळासाहेब सावंत यांच्या परिवाराने केले होते.

# जिल्हा परिषद शाळेजवळील उघड्या डीपीमुळे विद्यार्थ्यांच्या जीवांशी खेळ

### बार्शी नाका जि.प.शाळाजवळील डीपी तात्काळ हटवा

बीड दि १६(प्रतिनिधी)–शहरातील बार्शी नाका येथील जिल्हा परिषद शाळेसमोरील उघडी डीपी विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळत असल्याची गंभीर बाब समोर येत आहे. शिक्षणाच्या पवित्र परिसरात उच्चदाबाची वीज यंत्रणा असुरक्षित अवस्थेत उभी असल्याने पालक व नागरिकांमध्ये तीव्र चिंता व्यक्त केली जात आहे.कालच बीड शहरातील नगर रोड परिसरात डीपीचा शॉक लागून अवघ्या पंधरा वर्षांच्या विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असताना, बार्शी नाका येथील परिस्थिती अधिकच धोकादायक वाटू लागली आहे. या पार्श्वभूमीवर संभाव्य धोका ओळखून तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.सदर ठिकाणी उघड्या वायरिंग, खाली लोंबकळणाऱ्या केबल्स तसेच संरक्षक कंपाऊंडचा अभाव असल्याचे दिसून येते. शाळकरी मुले खेळताना किंवा नकळत त्या परिसरात गेल्यास मोठी दुर्घटना घडू शकते. पावसाळ्यात पाणी साचल्यास विद्युतप्रवाह पसरण्याची शक्यता अधिक वाढते, अशी भीती नागरिकांकडून व्यक्त केली जाते.शाळा परिसर हा सुरक्षित क्षेत्र असावा, अशी सर्वसामान्य अपेक्षा आहे. दररोज मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांची व नागरिकांची रहदारी असताना अशा धोकादायक यंत्रणेकडे दुर्लक्ष करणे अक्षम्य ठरू शकते.महावितरण ने तातडीने दखल घेऊन डीपीभोवती मजबूत संरक्षणभिंत उभारणे, वायरिंग सुरक्षित करणे, स्पष्ट इशारा फलक लावणे आणि नियमित तपासणी करणे या उपाय योजना कराव्यात. आवश्यक असल्यास डीपीचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करण्याचीही मागणी होत आहे.दुर्घटना घडल्यानंतर हालचाल करण्यापेक्षा आधीच खबरदारी घेणे अधिक महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांचे जीवन अमूल्य आहे आणि त्यांची सुरक्षा ही प्रशासनाची सर्वोच्च जबाबदारी आहे.



शाळेलाच्या कंपाउंड ला चिटकून असणारी डीपी तत्का हटवण्यात यावी अशी मागणी नागरिकांत व पालक वर्गातून होत आहे.

## पीएम श्री जि.प.कन्या शाळेत दहावीच्या विद्यार्थिनींना हॅपी परीक्षा किटचे वाटप



माजलगाव दि १६(प्रतिनिधी)– संपूर्ण शिक्षा (ज्ञानदान फाउंडेशन) यांच्या हॅपी परीक्षा कॅम्पेन अंतर्गत माजलगाव येथील पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक कन्या शाळेतील इयत्ता १० वीच्या ९० विद्यार्थिनींना परीक्षा साहित्य किट्सचे वाटप करण्यात आले. या किटमध्ये बॉल पेन,भूमिती साहित्य, पारदर्शक लेखन पॅड व पारदर्शक पाऊच यांचा समावेश असून, हे सर्व साहित्य महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाच्या परीक्षा नियमांनुसार आहे. ग्रामीण व शासकीय शाळांतील अनेक विद्यार्थिनींसाठी असे साहित्य सहज उपलब्ध नसते.या उपक्रमामुळे विद्यार्थिनींचा परीक्षेचा ताण कमी होऊन त्या अधिक आत्मविश्वासाने परीक्षा देऊ शकतील,अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.संपूर्ण शिक्षा (ज्ञानदान फाउंडेशन) यांच्या वतीने सर्व विद्यार्थिनींना बोर्ड परीक्षेसाठी व पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या असून,हा छोटासा आधार त्यांच्या आजच्या परीक्षेसोबतच उद्याच्या भविष्याला देखील बळ देईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## 'फनफेअर'चा तुलसी इंग्लिश स्कूलमध्ये जल्लोष

बीड (प्रतिनिधी) : देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी इंग्लिश स्कूल, बीड येथे 'फनफेअर' (आनंद मेळावा) मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी मनोरंजनासोबतच प्रत्यक्ष बाजारपेठेतील व्यवहारांचे धडे घेतले.

कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुण्या, तक्षशिला फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. प्रियांका रोडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शाळेच्या प्राचार्या उमा जगतकर प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या उपक्रमशीलतेचे कौतुक करत अशा उपक्रमांमुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते, असे प्रतिपादन केले.

फनफेअरमध्ये विविध खेळांचे स्टॉल, खाद्यपदार्थांचे स्टॉल तसेच कला व हस्तकला प्रदर्शनाचे सुयोग्य नियोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी स्वतः साकारलेल्या हस्तकला वस्तू आणि चित्रांचे प्रदर्शनही यावेळी मांडण्यात आले होते, ज्यामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. शेवटी सर्व मान्यवरांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# श्री क्षेत्र बेलेश्वर संस्थानचा विकास हा माझा संकल्प-आ.सुरेश आण्णा धस

### महाशिवरात्रीनिमित्त दर्शन घेऊन भाविकांची साधला संवाद



**पाटोदा / महेश बेदरे**

महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघाचे आ.सुरेश आण्णा धस यांनी १४ फेब्रुवारी रोजी बीड जिल्ह्यातील श्री क्षेत्र बेलेश्वर संस्थान, बेलगाव येथे भेट देऊन थोर संत ईश्वर भारती महाराज यांच्या समाधीचे भक्तिभावाने दर्शन घेतले. यावेळी महंत महादेव महाराज भारती तसेच शांतिब्रह्म तुकाराम महाराज भारती यांचेही त्यांनी दर्शन घेत आशीर्वाद घेतले.

कीर्तन प्रारंभी आ.धस यांनी उपस्थित भाविक व पंचक्रोशीतील ग्रामस्थांशी आपुलकीने संवाद साधत मंदिराच्या इतिहासाची व परंपरेची माहिती जाणून घेतली. या पुरातन मंदिराच्या जीर्णोद्धाराची तातडीची आवश्यकता अधोरेखित करत भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय, स्वच्छतागृह, निवारा व इतर मूलभूत सुविधा उभारणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ''श्री क्षेत्र बेलेश्वर संस्थान हे आध्यात्मिक श्रद्धास्थान असून त्याचा सर्वांगीण विकास करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी आणि भाविकांच्या सोयीसुविधांसाठी आवश्यक ती सर्वतोपरी मदत करण्यात येईल,'' असे आश्वासन आमदार सुरेश आण्णा धस यांनी यावेळी दिले.तसेच परिसरातील बांधकाम कामगार, मजूर व विद्यार्थ्यांची प्रगती व्हावी, शिक्षणाची उंची वाढावी आणि संस्थेचा विकास अधिक भक्कम व्हावा, अशी प्रार्थना त्यांनी भगवान महादेवाच्या चरणी केली. सर्वांना सुख, शांती व समृद्धी लाभो, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.या प्रसंगी पाटोदा नगरपंचायतीचे गटनेते बळीराम पोटे, नगरपंचायत सभापती किशोर आढागळे, हनुमंत काळे, वैद्यकीनी येथील युवा नेते अतुल मकाळ यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मातोरी ग्रामपंचायतीत वित्त आयोगाच्या निधीचा अपहार

### मुख्याधिकाऱ्याकडे तक्रार
### सखोल चौकशीची ग्रामस्थांची मागणी

शिरूर कासार (प्रतिनिधी) : शिरूर कासार तालुक्यातील मातोरी ग्रामपंचायतीला मिळालेल्या चौदाव्या व पंधराव्या वित्त आयोगाच्या निधीत मोठ्या प्रमाणावर अपहार व भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला असून, याबाबत मुख्याधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल करण्यात आली आहे. प्रत्यक्ष कामापेक्षा जास्त खर्च दाखवून तसेच काही कामे कागदोपत्रीच पूर्ण झाल्याचे दाखवून शासकीय निधीचा गैरवापर केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

ग्रामस्थांच्या तक्रारीनुसार, सरपंच, ग्रामसेवक व इतर कर्मचाऱ्यांच्या संगनमताने सन २०२३-२०२४, २०२४-२०२५ व २०२५-२०२६ या आर्थिक वर्षांमध्ये विविध विकासकामांच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात निधी खर्च दाखवण्यात आला. मात्र प्रत्यक्षात अनेक कामे झालीच नाहीत किंवा अत्यंत निकृष्ट दर्जाची कामे करून शासनाचा निधी लाटण्यात आला, असा आरोप करण्यात येत आहे.

तक्रारीत नमूद करण्यात आले आहे की, काही कामे केवळ कागदावरच दाखवून त्यांचा खर्च मंजूर करून घेण्यात आला. तर काही ठिकाणी केलेली कामे दर्जाहीन असून त्यासाठी अवाजवी रक्कम अदा करण्यात आली आहे. त्यामुळे हा प्रकार केवळ निष्काळजीपणाचा नसून सुनियोजित भ्रष्टाचाराचा असल्याचा संशय ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

या प्रकरणात आणखी धक्कादायक बाब म्हणजे शाळेसाठी खरेदी करण्यात आलेल्या साहित्याच्या दरांमध्ये मोठा तफावत आढळून आली आहे. बाजारात सुमारे दहा हजार रुपये किंमत असलेल्या टीव्ही संचाची खरेदी तब्बल ९९ हजार रुपयांना दाखवण्यात आल्याचा आरोप आहे. तसेच सुमारे पंधरा हजार रुपये किमतीचा इन्व्हर्टर तब्बल दीड लाख रुपयांना खरेदी केल्याचे कागदोपत्री दाखवण्यात आले आहे. या खरेदी व्यवहारांमुळे ग्रामपंचायतीच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

याशिवाय, काही कामे प्रत्यक्षात न करता देखील संबंधित एजन्सींना देयके अदा करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

### गेवराई पंचायत समितीतील लिपिक संवर्गातील
# कर्मचाऱ्यांचे विविध मागण्यांसाठी आंदोलन

### २३ फेब्रुवारीला बेमुदत काम बंद आंदोलन

गेवराई दि.१६ (प्रतिनिधी) : महाराष्ट्र शासनाच्या अंतर्गत प्रशासनाचा मुख्य आधारस्तंभ असलेल्या सर्व विभागातील लिपीक संवर्गाच्या चौथ्या वेतना आयोगापासुन वेतनश्रेणीत असलेली तफावत दूर करून सुधारीत वेतन श्रेणी लागू करणे, जशाच तशी जुनी पेन्शन लागू करणे, १ नोव्हेंबर २००५ पूर्वी अनुकंपाच्या प्रतिक्षा सुचीवर असलेल्या सर्वांना जुनी पेन्शन लागू करणे, गोदावरी महामंडळास स्वायत्ता करत असतांना वर्ग-३ व वर्ग ४ कर्मचा-यांचे वेतन पुवीप्रमाणे कोषागार कार्यालयामार्फत करणे यासह विविध मागण्यासाठी जय महाराष्ट्र शासकीय निमशासकीय अधिकारी व कर्मचारी संघटनेच्या वतीने गेवराई पंचायत समिती कार्यालयात शासकीय निमशासकीय अधिकारी व कर्मचारी संघटनेच्या वतीने निवेदन देवून असहकार आंदोलन करण्यात येत आहे.

दिलेल्या निवेदनात जय महाराष्ट्र शासकीय ,निमशासकीय अधिकारी व कर्मचारी संघटनेच्या वतीने म्हटले आहे की, महाराष्ट्र शासनाच्या अंतर्गत व प्रशासनाचा मुख्य आधारस्तंभ असलेल्या सर्व ४२६ विभागातील लिपीक संवर्गाच्या चौथा वेतन आयोगापासुन वेतन श्रेणीत असलेली तफावत दुर करुन सुधारीत वेतनश्रेणी लागू करणे व १ नोव्हेंबर २००५ पुर्वी अनुकंपाच्या प्रतिक्षा सुधिवर असलेल्या सर्वांना जुनी पेन्शन लागू करणे. या मागण्याकरीता प्रशासनाचे लक्ष वेधणेसाठी सनदशीर मार्गाने खालील प्रमाणे असहकार आंदोलन करण्यात येत आहे. यामध्ये दि.१६ फेब्रुवारी ते १७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत कार्यायालयात काळ्या फित लावून बसणे, दि.१८ फेब्रुवारी रोजी कार्यालयासमोर शांतता पुर्वक प्रलंबित मागण्या संदर्भात घोषणा देणे, दि.२० फेब्रुवारी रोजी मागण्यांसाठी पाठपुरावा करणे तर दि.२३ फेब्रुवारी २०२६ रोजी पासून बेमुदत काम बंद आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनचे निवेदन पंचायत समिती कार्यालय अधिक्षक नायगावकर यांच्याकडे देण्यात आले असून दिलेल्या निवेदनावर संघटनेचे अध्यक्ष देशमुख आर.पी., उपाध्यक्ष परशुराम पालिमकर , कोषाध्यक्ष रमेश गिरी, सचिव सचिन गिरी, महिला संपर्क प्रमुख श्रीमती अंबिका साळुंखे, श्रीमती रोहिणी येरडलवार , आलमगिर तांबोळी, ज्ञानेश्वर मोहिते, शकिल पठाण, बंडु राठोड, विशाल तळेकर, मनोज अविळे , हनुमंत डोईफोडे यांच्यासह आदिंच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# आश्वत्थलिंग देवस्थान हे आध्यात्मिक ऊर्जेचे केंद्र -आ.धस

### महाशिवरात्री उत्सवानिमित्त सांगता सोहळ्याला भाविकांचे अलोट गर्दी



**पाटोदा /महेश बेदरे**

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथे असलेल्या श्री क्षेत्र आश्वत्थलिंग संस्थानात महाशिवरात्रीनिमित्त आयोजित सप्ताह सांगता सोहळा भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या पवित्र सोहळ्यास आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघाचे आ.सुरेश धस यांनी भेट देत भगवान शिवाचे दर्शन घेतले व सप्ताह सोहळ्यात सहभाग नोंदविला.

मधुकर महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली श्रद्धा, भक्ती आणि हरिनामाच्या गजरात संपूर्ण सप्ताह पार पडला. सांगता सोहळ्याच्या दिवशी मंदिर परिसरात भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. ''ॐ नमः शिवाय'' च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता.

यावेळी आमदार सुरेश धस म्हणाले, ''श्री क्षेत्र आश्वत्थलिंग ही केवळ धार्मिक स्थळ नाही, तर सामाजिक एकात्मतेचे आणि आध्यात्मिक उर्जेचे केंद्र आहे. अशा पवित्र स्थळी येऊन भगवान शिवाचे दर्शन घेण्याचे भाग्य लाभणे ही माझ्यासाठी अत्यंत समाधानाची बाब आहे. महाशिवरात्रीचा हा सप्ताह समाजात सद्भाव, संयम आणि सकारात्मकतेचा संदेश देणारा आहे. भगवान शिवाच्या कृपेने प्रत्येकाच्या जीवनात शांती, समाधान आणि समृद्धी नांदो, हीच प्रार्थना आहे असे सांगत त्यांनी पुढे नमूद केले की, ग्रामीण भागातील धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरा जपणे ही आपली सामूहिक जबाबदारी असून अशा उपक्रमांमुळे समाजातील बंधुभाव अधिक दृढ होतो. या कार्यक्रमास माजी आमदार भीमराव धोंडे यांच्यासह माऊली आप्पा जरांगे, भाऊसाहेब भवर तसेच अनेक कार्यकर्ते, पदाधिकारी आणि भाविक भक्तांची प्रचंड मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## पिंपळनेच्या महादेव मंदिरात हर हर महादेवचा जयघोष

पिंपळनेर (प्रतिनिधी) : बीड तालुक्यातील पिंपळनेर येथील महादेवाच्या मंदिरात भाविकांनी हर हर महादेवचा जयघोष करत दर्शन घेतले.

पहाटे अभिषेक केल्यानंतर मंदिर दर्शनासाठी खुले केले. त्यानंतर येथे भाविकांची मोठी रांग पाहायला मिळाली. येथे येणाऱ्या भाविकांची गैरसोय होणार नाही याबाबत दक्षता विश्वस्त मंडळांनी घेतली. मंदिर दर्शनासाठी मध्यरात्री १२ वाजता महापूजा केल्यानंतर भाविकांसाठी खुले करण्यात आले. बऱ्याच अंतरापर्यंत भाविकांची गर्दी झाली होती. दरम्यान भाविकांना शाबु खिचडीचा प्रसाद उपलब्ध करून देण्यात आला होता. कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून मंदिर परिसरात चोख बंदोबस्त ठेवला होता.

## किल्ले धारूर येथे यंशोदिप पब्लिक स्कूल वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न



धारूर (वार्ताहर) : धारूर येथे यंशोदिप पब्लिक स्कूल शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन १४ फेब्रुवारी सायंकाळी ५ वाजता उत्साहात झाले

कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुणे श्री देविदास वाघमोडे (साहाय्यक पोलीस निरीक्षक धारूर )सुरेश शिनगारे , सुर्यकांत जगताप सामाजिक कार्यकर्ते, सय्यद हकीम सर विस्तार अधिकारी यांचा हस्ते सरस्वती प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले

शाळेचा मुख्याध्यापिका सौ.चित्रा दीखत शाळेचा प्रास्ताविक केले.मुख्य कार्यक्रमाची सुरुवात गणेश वंदना या गीताने झाली त्यानंतर शेतकरी गीत देशभक्ती नाटक नाटिका यातुन शाळेचा बालकलाका यांनी प्रेक्षकांचे मने जिंकली विद्यार्थांनी वार्षिक स्नेहसंमेलन विविध गाण्यांवर कलाकारी पाहुण रसिक प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले या अदिती काळे व विद्यार्थीनी आरंभ है प्रचंड या गाण्यावर बहारदार गाण्याने गावातील रसिक प्रेश्रकांची मने जिंकली कार्यक्रम पाहण्यासाठी गावातील महिला पुरुष. मोठया संख्येने उपस्थित होते कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचा मुख्याध्यापिका चित्रा दीखत शिक्षण वृंद परिश्रम घेतले.


**टि.सी.हरवला आहे**

**कृष्णा शिवाजी शेळके**

रा. धारवंटा ता. गेवराई जि. बीड या नावाचा बारावी पासचा टिसी धारवंटा ते बीड प्रवासा दरम्यान हरवला आहे. सापडल्यास संपर्क करा

**- संपर्क -**

**मो ८०८०४ ३३३४९**



**टि.सी.हरवला आहे**

**सतीश विजय गोळेकर**

या नावाचा १२ वी पास चा टीसी माजलगाव पुरुषोत्तमपुरी गाडीत प्रवासा दरम्यान हरवला आहे सापडल्या संपर्क करावा

**- संपर्क -**

**मो ९९२१९३१८३३**


# श्री क्षेत्र संगमेश्वर संस्थान कुर्ला येथे महाशिवरात्री सप्ताहाची भक्तीमय सांगता



कुर्ला दि १६ (प्रतिनिधी) -बीड तालुक्यातील श्री क्षेत्र संगमेश्वर संस्थान महादेव मळी येथे महाशिवरात्रीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या सप्ताहाची सांगता दि. १६१६ फेब्रुवारी २०२६ रोजी अत्यंत भक्तीमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

या सप्ताहाच्या निमित्ताने कुर्ला तसेच पंचक्रोशीतील ग्रामस्थांना महाराष्ट्रातील विविध संतांचे विचार, अध्यात्मिक संदेश आणि कीर्तनरूपी मार्गदर्शन ऐकण्याची संधी लाभली. सप्ताहभर धार्मिक कार्यक्रम, भजन, कीर्तन व प्रवचनांमुळे परिसरात भक्तीचा दरवळ निर्माण झाला होता. विशेष म्हणजे, या सप्ताहादरम्यान परिसरातील भाविकांना वाराणसी (काशी) येथील पद्मश्री गणेश्वरशास्त्री द्राविड गुरुजी यांच्या दर्शनाचा लाभही मिळाला. त्यांच्या उपस्थितीमुळे सप्ताहाला अधिक आध्यात्मिक अधिष्ठान लाभले.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी काल्याच्या कीर्तनाची सेवा मठाधिपती ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज मस्के यांनी केली. आपल्या प्रभावी कीर्तनातून त्यांनी सुसंगतीचे महत्त्व, अध्यात्मातील विविध विषय तसेच भगवंताचे स्मरण व सत्संग जीवनात किती आवश्यक आहे यावर सखोल मार्गदर्शन केले. संपूर्ण परिसर हर हर महादेवच्या जयघोषाने दुमदुमून गेला. संगमेश्वर संस्थानच्या वतीने सप्ताह यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी सर्व भक्त, ग्रामस्थ व सेवेकऱ्यांचे आभार मानण्यात आले.


## जाहीर प्रगटन

बीड जिल्हा व परिसरातील तमाम जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार **बाळू संतराम साळवे,** रा. बेलापूरी, ता.जि. बीड यांनी दिलेल्या माहिती व सूचनेवरून व अधिकृत केल्यावरुन मी सर्वांच्या माहिती करिता हे जाहीर प्रगटन देत आहे की, **रामभाऊ बापूराव भालशंकर, रा. नवनाथ नगर, एमआयडीसी, बीड, ता.जि. बीड यांनी प्लॉटचे मुळ मालक १) जगदीश भास्करराव राऊतमारे, २) रेखा भास्करराव राऊतमारे, ३) सुनिता दिलीप दाणी, ४) सुनिल भास्करराव राऊतमारे** यांच्या कडून ईसारपावती आधारे घेतला असून, त्या नुसार रामभाऊ बापूराव भालशंकर त्यांच्या ताब्यातील मौजे बहीरवाडी, ता.जि. बीड येथील स.नं. ३२/आ/२ तरफ बोबडे मधील सहन प्लॉट क्र. ३० ज्याची साईज पुर्वपश्चिम ४० फुट व दक्षिणोत्तर ३० फुट ज्याचे एकूण क्षेत्रफळ १२०० चौ. फुट आहे. ज्याची चतुःसिमा पुर्वेस १५ फुट रुंदीचा रस्ता, पश्चिमेस १५ फुट रुंदीचा रस्ता, दक्षिणेस प्लॉट क्र. ३१, उत्तरेस प्लॉट क्र. २९ मनोहर गोविंदराव राऊतमारे यांचा प्लॉट आहे.

उपरोक्त वर्णनाचा प्लॉट मालकाने माझे पक्षकार यांना असा विश्वास दिला आहे की, सदर प्लॉट हा पुर्णपणे निर्विवाद, र्निजोखीम, कोणत्याही न्यायालयात वाद चालु नाही अथवा प्रलंबीत नाही तसेच कोणत्याही राष्ट्रीयकृत, सहकारी बँक पत संस्था अथवा खाजगी व्यक्तींचा कर्ज व पोटगीचा बोजा नाही. तसेच सदर प्लॉट संपादित झालेला नाही अथवा तशी नोटीस प्लॉट धारकास आलेली नाही. व सदर प्लॉट हा कोणत्याही स्थानिक संस्थेने रिजर्व्ह केलेला नाही. तसेच प्लॉट मालकाने माझे पक्षकारास आणखी असा विश्वास दिला आहे की, त्यांनी माझे पक्षकारा शिवाय ईतरां सोबत सदर प्लॉटच्या संबंधाने भाडेपत्र, गहाणपत्र, इसारपावती, खरेदीखत, मृत्यूपत्र, बक्षीस पत्र अधिकार पत्र, इ. द्वारे मालकी हक्क व ताबा हस्तांतरणाचा व्यवहार केलेला नाही. तसेच सदर प्लॉट त्यांचे शिवाय त्यांचे वालीवारस व इतरांच्या कोणताही हक्क संबंध नाही तरी माझे पक्षकार याद्वारे सर्वांना सूचित करतात की, वरील जमीन खरेदी विक्री व्यवहार बाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा व्यवहार, गहाण, दान, बक्षीस, विक्री, लीज, अधिकार व वारस हक्क तसेच काही आक्षेप अथवा हरकत किंवा हितसंबंध असल्यास हे जाहीर प्रगटन दिल्या पासून १५ दिवसाचे आत संपूर्ण कागदपत्रासह खालील पत्यावर आपले आक्षेप हक्क संबंधाचे कागदपत्रासह लेखी स्वरुपात नोंदवावीत अन्यथा व्यवहारास कोणाचाही आक्षेप नाही असे समजुन कायमस्वरुपी नोंदणीकृत खरेदीखत करण्यात येईल व मुदती नंतर कोणाचाही आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

सबब हे जाहीर प्रगटन.

मार्फत
**ॲड.शैलेंद्र केशवराव कांबळे**
मो.९८८१५६४७४८

जाहीर प्रगटन देणार मार्फत
**बाळू संतराम साळवे**
रा.बेलापुरी, ता.जि.बीड.
मो.९८३४२२४३५९, ९९६०१११७७१

16556/13692


# गावातच अडचणींचा निपटारा, शेतकऱ्यांना दिलासा ; माळापुरीत तहसीलदार शेळके यांची जनजागृती बैठक



बीड दि.१६ (प्रतिनिधी):- कुर्ला मंडळातील माळापुरी येथे आयोजित करण्यात आलेली महसूल मंडळस्तरीय आढावा बैठक केवळ औपचारिकता न राहता, थेट नागरिकांच्या प्रश्नांना हात घालणारी आणि शासन आपल्या दारी या संकल्पनेला प्रत्यक्ष आकार देणारी लोकाभिमुख संवादसभा ठरली. बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीत प्रशासन आणि नागरिक यांच्यातील अंतर लक्षणीयरीत्या कमी झाल्याचे चित्र दिसून आले. शेतकऱ्यांशी थेट संवाद साधत त्यांच्या अडचणी ऐकून जागेवर मार्गदर्शन करण्यात आल्याने गावकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला.

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभाग अधिक गतिमान, पारदर्शक आणि लोकाभिमुख करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या नियमित आढावा बैठका, तपासणी दौरे आणि स्पष्ट सूचनांमुळे प्रशासनाच्या कार्यक्षमतेला नवी दिशा मिळाल्याचे या बैठकीत जाणवले.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक, उपविभागीय अधिकारी कविता जाधव तसेच निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रशासन अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी विविध उपक्रम प्रभावीपणे राबवले जात असल्याचे अधोरेखित करण्यात आले. प्रशासन केवळ नियमांची अंमलबजावणी करणारी यंत्रणा न राहता समाजाच्या संवेदनशील प्रश्नांवर सक्रिय भूमिका घेणारी व्यवस्था बनावी, या दृष्टीने निर्णय घेतले जात असल्याचे स्पष्ट झाले. बैठकीत अतिवृष्टीमुळे झालेल्या पिक नुकसानीबाबत अनुदान, ई-पीक नोंदणी, ई-पीक पाहणी, नुकसान भरपाईसाठी आवश्यक कागदपत्रे, आधार कार्ड अद्ययावत ठेवण्याची आवश्यकता तसेच थेट लाभ योजनांचा लाभ घेण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. सेवा मित्र अंतर्गत विविध प्रमाणपत्रांचे वितरणही करण्यात आले. यावेळी कृष्णा युवराज शिंदे यांचे ई डब्लू एस प्रमाणपत्र वाटप करण्यात आले आणि सुधाकर रावसाहेब डोंगरे यांच्या शेतात ई पीक पाहणी ॲपमधून पीक पाहणी करण्यात आली.

तहसीलदार शेळके यांनी शेतकऱ्यांच्या अडचणी शांतपणे ऐकून घेत प्रत्यक्ष मार्गदर्शन केले. वेळेवर केलेले काम म्हणजे अर्धे यश या म्हणीप्रमाणे तातडीने प्रश्न सोडवण्यावर भर देण्यात आला. यावेळी सामाजिक विषयांवरही बैठकीत विशेष भर देण्यात आला. बालविवाह रोखण्यासाठी गावपातळीवर जनजागृती, शाळा-महाविद्यालयांत समुपदेशन, ग्रामपंचायत आणि पोलीस यंत्रणेच्या समन्वयातून प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याचे आवाहन करण्यात आले. जशी करणी तशी भरणी या म्हणीचा दाखला देत समाजातील कुप्रथा रोखण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे शेळके यांनी स्पष्टपणे सांगितले. पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण, जलसंधारण, व्यसनमुक्ती, प्लास्टिकमुक्त अभियान आणि नैसर्गिक साधनसंपत्तीच्या जतनासाठी प्रशासनाकडून ठोस पावले उचलली जात असल्याचे त्यांनी नमूद केले. शिक्षण क्षेत्रात शाळाबाह्य मुलांना मुख्य प्रवाहात आणणे, विद्यार्थ्यांची गळती थांबवणे, शिक्षक-पालक समन्वय वाढवणे आणि शैक्षणिक सुविधा बळकट करणे या उपाय योजनांवरही चर्चा झाली. ग्रामीण विकासाच्या दृष्टीने पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य सुविधा आणि शासकीय योजनांचा लाभ तळागाळापर्यंत पोहोचवण्याचा निर्धार प्रशासनाने व्यक्त केला.

बैठकीत उपस्थित असलेल्या एका शेतकऱ्याने समाधान व्यक्त करत सांगितले, आमचे प्रश्न गावातच ऐकले जात आहेत, हीच आमच्यासाठी मोठी दिलासा देणारी बाब आहे. आता तालुक्याच्या फेऱ्या माराव्या लागत नाहीत. ग्रामपंचायत प्रतिनिधींनीही अशा बैठका विश्वास वाढवणाऱ्या ठरतात, असे मत व्यक्त केले.बैठकीस मंडळ अधिकारी जितेंद्र वाघ, ग्राम महसूल अधिकारी दुष्यंत शेळके, संजय नेवडे, सुनील प्रधान, उमेश खिंडरे, माणिक पांढरे, ग्रामपंचायत अधिकारी मिसाळ, कृषी अधिकारी थोरात आणि गव्हाणे, माळापुरीचे सरपंच अशोक ढास, उपसरपंच समीर बेग, आपले सरकार सेवा केंद्र चालक मिर्झा तसिम बेग, वैभव कुटे, ग्रामस्थ संदीप तिपाले, जयदत्त बादाडे, रामनाथ तीपाले तसेच अनेक ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी कृषी सहाय्यकांनी विविध कृषी योजनांचे तसेच ई-पीक संबंधित प्रात्यक्षिकही दाखवले. ग्रामस्थांनी मांडलेल्या अडचणी तहसीलदार शेळके यांनी संयमाने ऐकून घेतल्या. अनेक प्रश्नांवर जागच्या जागी मार्गदर्शन देत काही विषयांवर तात्काळ तोडगे सुचविण्यात आले. त्यामुळे नागरिकांना तालुका किंवा जिल्हा मुख्यालयात वारंवार फेऱ्या मारण्याची गरज भासली नाही. थेंबे थेंबे तळे साचे या म्हणीप्रमाणे छोट्या उपाययोजनांतून मोठे बदल घडू शकतात, हा विश्वास नागरिकांत निर्माण झाला.एकूणच माळापुरी येथील ही महसूल मंडळस्तरीय आढावा बैठक राज्य शासनाच्या धोरणात्मक दिशेचा, विभागीय व जिल्हास्तरीय मार्गदर्शनाचा आणि तालुकास्तरावरील संवेदनशील अंमलबजावणीचा सुंदर संगम ठरली. प्रशासनाची तत्परता, निर्णयक्षमता आणि नागरिकांचा वाढता विश्वास यामुळे ही बैठक लोकाभिमुख प्रशासनाचा आदर्श नमुना ठरल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. गावात उपाय, जनतेत विश्वास हा संदेश देणारी ही बैठक ठरली.

# पार्श्वभूमी

दि.१७ फेब्रुवारी २०२६ मंगळवार


## चिंतेश्वर पाणपोईचे उद्घाटन शिवराज पवार यांच्या हस्ते संपन्न

गेवराई दि.१६ ( प्रतिनिधी) गेवराई शहरातील कोल्हेरवेस, तहसील रोड, दाभाडे गल्ली येथे महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे तालुका अध्यक्ष नागेश पंडित यांनी सामाजिक भान लक्षात घेऊन पाणपोई सुरू केली आहे. याचे उद्घाटन युवा नेते शिवराज दादा पवार, यांच्या हस्ते करण्यात आले या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून नगरपरिषद गेवराईचे उपनगराध्यक्ष भगवान जिजा घुबर्डे, माजी मुख्याध्यापक राजेंद्र घुंबर्डे , संपादक सुनील पोपळे, नाभिक समाजाचे नेते नानासाहेब पंडित, बाप्पा जाधव, मोहन अप्पा बेंद्रे, बाबासाहेब सावंत, सागर ठाकूर, गोरख मोटे , ऋषिकेश मोटे विजय पंडित, हरि पंडित, शिवांश पंडित,

## अभिनय तंत्रः नाटक आणि सिनेमा नाटय प्रशिक्षण शिबीर

बीड (प्रतिनिधी) : येथील सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बीड आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवशीय अभिनय तंत्र : नाटक सिनेमा या विषयावर नाटय प्रशिक्षण शिबीर दिनांक १७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ठिक १०.०० वाजता होणार आहे. संभाजीनगर येथील सिनेमॅटोग्राफर, दिग्दर्शक श्री भूषण खोडके हे मार्गदर्शन करणार आहेत.

पान २ वर

## नगर परिषदच्या नाकावर टिच्चून अतिक्रमण करण्यास पुन्हा सुरुवात

# अवघ्या २८ दिवसात परिस्थिती जैसे थे

### तत्काळ कार्यवाही न केल्यास आंदोलन करणार -प्रमोद पुसरेकर

बीड दि.१६(प्रतिनिधी):- शहरातील अत्यंत रहदारीचा आणि गजबजलेला रस्ता म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते कारंजा या रस्त्याच्या दुतर्फा रस्त्यावरच अतिक्रमणे करून व्यवसाय थाटण्यात आले असून या मुळे नेहमीच वाहतुकीची कोंडी होतअसल्याने ही अतिक्रमणे तत्काळ काढण्यात यावी अशी मागणी पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते प्रमोद पुसरेकर यांनी मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्या कडे डिसेंबर महिन्यात केली होती. मागणीची दखल घेत ही अतिकमने काढण्यात आली मात्र नगर परिषद प्रशासनाच्या नाकावर टिच्चून अवघ्या दिड महिन्यात ही अतिक्रमणे पुन्हा थाटण्यात येत असून या बाबत सांगूनही दुर्लक्ष केले जात आहे. ही अतिकमने तत्काळ न काढल्यास आंदोलन करणार असल्याच्या ईशारा देण्यात आला आहे.



बीड शहरातील अत्यंत रहदारीचा आणि गजबजलेला रस्ता म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते कारंजा या रस्त्याच्या दुतर्फा रस्त्यावरच अतिक्रमणे करून व्यवसाय थाटण्यात आले राजुरीवेस भागात असणारे मुख्य डाक घर (पोस्ट ऑफिस) हे नेहमीच विविध कामासाठी नागरिकांनी गजबजलेले असते. शहरातील हजारो नागरिक रोज या कार्यालयात कामानिमित्त येत जात असतात. मात्र या कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना आपली दुचाकी, सायकल आणि तुरळक प्रमाणात चारचाकी वाहने लावण्यास जागाच नसल्याने नागरिकांची अडचण मोठ्या प्राणावर होत आहे. या रस्त्यावर नगर परिषद कार्यालय आहे, जिल्हा मध्यवर्ती बँक आहे, छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण आहे, जिल्हा परिषद कार्यालय आहे, बांधकाम कार्यालय आहे, भाजी मंडई कडे जाण्याचा हाच रस्ता आहे, अनेक मोठे व्यासायिक प्रतिष्ठाने आहेत. त्यामुळे हा रस्ता नेहमीच गर्दीने भरलेला असल्याने वाहतुकीची कोंडी कायम ठरलेली. पण या कडे प्रशासनाकडून सोईस्करपणे दुर्लक्ष केले जात आहे. महत्वाचे म्हणजे पोस्ट ऑफिस बाहेर रस्त्यावर दुतर्फा करण्यात आलेली नालीवर अतिक्रमण धारक हातगाडे विक्रेते यांचे स्वतः ची खाजगी मालमत्ता असल्या प्रमाणे कब्जा करून बसले आहेत. अर्धा रस्ता काबीज करण्यात आला आहे. तसेच या ठिकाणी कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना हे अतिक्रमण धारक हातगाड्यासमोर दुचाकी लावण्यास अलिखित मनाई हुकूम करण्यात आला आहे. जर कोणी दुचाकी, सायकल लावण्याचा प्रयत्न केला तर आधी शिव्या, नंतर धमकी आणि वेळ प्रसंगी अंगावर धावून येण्याचे प्रकार काही वेगळे नाहीत. त्यातच भर म्हणून शहर वाहतूक पोलीस दंडात्मक कारवाई करण्यास कसलीच कसर सोडत नाहीत. रोज या ठिकाणी गाडी पार्किंग केल्या मुळे नागरिकांना आर्थिक झळ पोहचत आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक, शारीरिक, मानसिक पिळवणूक होत आहे. ही पिळवणूक .मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड. यानी ही अतिक्रमणे तत्काळ काढून नागरिकांना दिलासा देऊन त्यांची

पान २ वर

## मुख्य रस्त्यावर झाले भांडण ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल

# माजलगावात गाडीला कट का मारला?

**माजलगाव दि.१६ (प्रतिनिधी) :- शहरातील मुख्य रस्त्यावर असलेल्या चव्हाण हॉस्पिटल समोर स्कुटीला कट का ? मारला असे विचारले म्हणुन रविवारी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास मारहाण केल्याप्रकरणी पाच जणाविरुद्ध ॲट्रॉसिटी क्टनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून यातील पाचही आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे.**

रविवारी रात्री शुभम रूपचंद कांबळे हा युवक स्कुटी (एम.एच.२३ बीके ५१९३ ) हा मुख्य रस्त्यावरून जात असताना चव्हाण हॉस्पिटल समोर रवि कुऱ्हाडे याने कट मारला. याबाबत शुभम याने कट का ? मारला अशी विचारणा केली असता रवि कु-हाडे याने शुभम यास जातीवाचक शिवीगाळ करत स्कुटीला पाठीमागून धडक दिली व शुभम यास खाली पाडून रवि कुऱ्हाडे व लक्ष्मण शिंदे यांनी गैर कायद्याची मंडळी जमवुन शुभमला मारहाण केली. यावेळी शुभम या ठिकाणाहून पळुन जात असताना विशाल चव्हाण , विलास चव्हाण व राहुल चव्हाण यांनी त्यास पकडून ठेवले व रवि कु-हाडे याने यावेळी त्याचा गळा दाबून दिवे मारण्याचा प्रयत्न केला. यावेळी लक्ष्मण शिंदे याने शुभमला अवघड जागेवर , छाती व पोटात लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. यावेळी शुभम याचे वडील रूपचंद कांबळे हे या ठिकाणी आले असता त्यांना रवि कु-हाडे व विलास चव्हाण याने जातिवाचक शिवीगाळ करत जिवे मारण्याची धमकी दिली.

या प्रकरणी शुभम रूपचंद कांबळे व रूपचंद साधोजी कांबळे यांच्या फिर्यादीवरून रवि कुऱ्हाडे , विशाल चव्हाण , विलास चव्हाण , राहुल

पान २ वर

# महाशिवरात्रीनिमित्त शिवभक्तांना फराळ वाटप

## शिंदे गटाचे फुलचंद कराड यांचा

परळी दि १६ (प्रतिनिधी)– प्रभू वैद्यनाथ मंदिर येथे महाशिवरात्री निमित्त लाखो शिवभक्तांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. या पार्श्वभूमीवर शिवभक्तांची गैरसोय होऊ नये आणि उपवासधारक भाविकांना फराळाची तसेच पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी, या उदात्त हेतूने सोमेश्वर मंदिराच्या पालखी सोहळ्यासही भगवान सेनेचे सरसेनापती तथा शिवसेना शिंदे गटाचे महाराष्ट्र राज्याचे समन्वयक फुलचंद कराड यांच्या वतीने राजगिऱ्याचे लाडू व केळीचे वाटप करण्यात आले.

यावेळी सोमेश्वर पालखीचे फुलचंद कराड यांनी मनोभावे दर्शन घेतले. हजारो भाविकांनी या फराळाचा लाभ घेत सेवाकार्यास कृतज्ञतापूर्वक प्रतिसाद दिला. महाशिवरात्रीच्या पावन



पर्वावर भक्ती आणि सेवाभाव यांचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला. महाशिवरात्रीसारख्या पवित्र पर्वावर सामाजिक बांधिलकी जपत करण्यात आलेल्या या उपक्रमाचे नागरिकांकडून कौतुक होत आहे. मंदिर परिसरात सकाळपासून रात्री उशिरापर्यंत चाललेल्या या वाटपामुळे शिवभक्तांना मोठा दिलासा मिळाला. या प्रसंगी माऊली फड भक्तराम कांदे, विश्वनाथ आंबा मुंडे, रमेश चव्हाण, विठ्ठल नागरगोजे, प्रवीण कराड, लिंबोट्याचे उपसरपंच प्रकाश राठोड, माजी उपसरपंच बाबुराव राठोड, जयराम मुंडे, बबन जाधव ,लहुदास तांदळे, इद्रमोहन मुंडे, बालासाहेब पडीले, नाथराव केंद्रे, मारुती बेंबळे, दत्तात्रय कोपनर, विश्वंभर दोडके, बळीराम मुंडे, भक्तराम मुंडे, संदीप माने, बालासाहेब नागरगोजे, सचिन रणखांबे, महेश गवळी, बालासाहेब मुळे, मंचक मुंडे आदींसह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रशासक काळात पाणीपुरवठा टेंडरात करोंडांचा भ्रष्टाचार, संबंधित अधिकारी व नगरसेवकांवर कार्यवाही करा- रशिद शेख

माजलगाव दि १६ (प्रतिनिधी ) नगरपरिषद माजलगाव मध्ये १५वा वित्त आयोग जिल्हाधिकारी यांच्या प्रशासकीय मान्यता अंतर्गत माजलगाव शहर पाणीपुरवठा योजना चालविणे व देखभाल दुरुस्ती करण्याबाबत सर्वसाधारण सभा दि.१४/०९/२०२१ ठराव क्र ९७ वरुन मंजूर दर ६,८९,९९९ रु प्रति महिना एक वर्षासाठी मंजूर ३१/०३/२०२२ रोजी अंबाजोगाई येथील कंपनीला देण्यात आला पण आर्थिक देवाणघेवाण करुन मुदतवाढ तीन ते चार वर्षे करुन करोंडा भ्रष्टाचार करण्यात आला असुन धातुर मातुर कामगार दाखवुन करोंडाचे बील पास करण्यात आला आहे.पाणीपुरवठा टेंडर चे कामगारांचे हजेरीपट नाही,किमान वेतन नाही,पीफ नाही, इन्शुरन्स नसुन फक्त कागदावरच संख्या दाखवून करोडोंची बील पास करून राज्य सरकारला चुना लावणारे अधिकारी, कर्मचारी व संबंधित लोकांवर तात्काळ चौकशी करून कारवाई करा तसेच प्रशासक काळात

पान २ वर

# बीडकरांच्या सेवेत कामधेनू आयुर्वेदिक चिकित्सालय

## श्रीगुरु चैतन्यमहाराज देगलूरकर यांच्या हस्ते होणार शुभारंभ

बीड दि.१६(प्रतिनिधी):- कामधेनू आरोग्यधाम व आयुर्वेदिक रिसॉर्ट मोरेश्वर देवस्थानजवळ, कोळवाडी, ता. जि. बीड तर कामधेनू आयुर्वेदिक चिकित्सालय हे बीड शहरातील पारनेरकर सभागृहाच्या जवळ, नाट्यगृह रोड, बीड या ठिकाणी सुरू केले जाणार आहे. याचा शुभारंभ श्रीगुरु चैतन्यमहाराज देगलूरकर (पंढरपूर) यांच्या हस्ते बुधवार, दि.१८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वा. संपन्न होत आहे.

बीडकरांच्या सेवमध्ये मागील तीन तपापासून श्रीनिवास कुलकर्णी आणि मंजुषा श्रीनिवास कुलकर्णी कामधेनू भोजनालयाच्या माध्यमातून घरगुती जेवनाची सेवा सुरू केलेली आहे. केवळ यावरच न थांबता या दांम्पत्यांनी बाहेर गावावून बीड येथे विविध कामासाठी येणाऱ्या नागरिकांसाठी २००७मध्ये मोठा मुलगा सुमीत यांच्या नेतृत्वाखाली कामधेनू अतिथ्य च्याद्वारे मुक्कामाची व्यवस्था उपलब्ध केली. पुढे २०११ मध्ये पशुधन आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी वृध्दाश्रम सुरू केले तेही निसर्गरम्य ठिकाणी पाली घाटाच्या पायथ्याला कोळवाडी या ठिकाणी कामधेनू आरोग्यधाम. या ठिकाणी देशी गायी यांची गोशाळा तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी वृध्दाश्रम साकारले आहे. मुलगा अरविंद याने वैद्यकिय पदवी मिळवली आहे. आता १८ फेब्रुवारी २०२६ रोजी त्याच्या माध्यमातून कामधेनू आयुर्वेसिक चिकित्सालय : केअरसेंडर/

पान २ वर

# बीड जिल्ह्यातील तरुण बिल्डर्स पनवेलमध्ये जिल्ह्याचे नाव उज्वल करतील-आ.सुरेश धस

पनवेल (प्रतिनिधि): महाराष्ट्रातील मुंबईच्या जवळ असलेले वेगाने विकसित होणारे शहर पनवेल येथे नुकतेच ड्रीम घर प्रायव्हेट लिमिटेड या फर्मचे कॉर्पोरेट कार्यालयाचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकरे यांच्या हस्ते पार पडले. या प्रसंगी विशेष अतिथी म्हणून आमदार सुरेश धस उपस्थित होते.

कार्यक्रमाला संबोधित करताना आमदार सुरेश धस यांनी ड्रीम घर प्रायव्हेट लिमिटेडच्या संचालकांना अभिनंदन केले, ज्यापैकी बहुतेकांचा संबंध बीड जिल्ह्याशी आहे. ते म्हणाले की, ही फर्म केवळ पनवेलच नव्हे तर संपूर्ण राज्यात बीड जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करेल. त्यांनी आशा व्यक्त केली की, उत्तम गुणवत्तेसह ठरलेल्या वेळेत लोकांना त्यांचे घर सुपूर्द केले जातील आणि ते स्वतः यावर देखरेख ठेवतील. त्यांनी महाराष्ट्र राज्य आणि देशाच्या विकासाबाबतही आपले विचार मांडले. आमदार प्रशांत ठाकरे यांनी ड्रीम घर प्रकल्पावर आनंद व्यक्त करताना सांगितले की, पनवेल आज विकासाच्या उंचीवर पोहोचले आहे. नवीन मुंबईचे आंतरराष्ट्रीय विमानतळ, रेल्वे जंक्शन आणि इतर सुविधांमुळे हे शहर राज्यात अग्रेसर ठरले आहे. त्यांनी सांगितले की, ड्रीम घर फर्मसाठी येथे विकासाच्या प्रचंड संधी उपलब्ध आहेत आणि आमदार सुरेश धस यांसारख्या ज्येष्ठ जनप्रतिनिधींच्या समर्थकांना सहाय्य करणे त्यांच्यासाठी आनंदाची गोष्ट आहे.

कार्यक्रमात संचालक अनिल काठोडे यांनीही संबोधित



करत प्रकल्पाची सविस्तर माहिती दिली आणि विश्वास दिला की, त्यांची फर्म उच्च गुणवत्ता आणि आधुनिक सुविधांनी युक्त फ्लॅट योग्य किंमतीत

पान २ वर

# निळकंठ शेजुळ यांचे निधन

माजलगाव (प्रतिनिधी) खरात आडगाव येथील तरुण निळकंठ अशोकराव शेजुळ वय ३५ वर्ष यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दिनांक १५ फेब्रुवारी रोजी रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास महाशिवरात्रीच्या दिवशी दुःखद निधन झाले आहे या घटनेमुळे सर्वत्र कळा पसरले आहे. निळकंठ शेजुळ हा कोणाच्याही आणि कोणत्याही कामाला धावून येणारा तरुण म्हणून त्याची सर्वत्र ख्याती होती तो सतत हसतमुख व विविध राजकीय पक्षाचे नेते कार्यकर्ते यांच्यासोबत त्याचे जवळचे संबंध होते तो कुणाच्याही कामाला हसत हसत पुढे येऊन काम करणारा तरुण म्हणून त्याच्याकडे पाहिले जायचे तो सर्वत्र परिचित होता परंतु अचानक दिनांक १५ फेब्रुवारी रोजी रात्री अचानक त्याच्या छातीत दुखू लागल्याने त्याला खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता त्याला अधिक उपचारासाठी संभाजीनगर येथील खाजगी रुग्णालयात नेत असताना त्याचे रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने त्याचे दुखद निधन झाले आहे त्यांच्या पार्थ देहावर



पान २ वर

# माजलगाव येथे मंगलनाथ मंदिरात शिव महापुराण कथेची सांगता

माजलगाव (प्रतिनिधी):-माजलगाव येथील शहरातील बायपास रोडवरील पुरातन मंगलनाथ मंदिर येथे महाशिवरात्री निमित्त आयोजित करण्यात आलेल्या मंगलनाथ यात्रा महोत्सवात शिव महापुराण कथेची सांगता उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात संपन्न होत आहे. धार्मिक श्रद्धा, आध्यात्मिक ऊर्जा आणि भाविकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला आहे.

महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त आयोजित या शिव महापुराण कथेचे आयोजन मंदिराच्या पुजारी सौ. यशोदा ज्ञानेश्वर जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. त्यांच्या संकल्पनेतून आणि नियोजनातून हा सोहळा अत्यंत सुरळीत पार पडत आहे. यावर्षीच्या शिव महापुराण कथेचे यजमान म्हणून बालासाहेब बाबुराव गिरी यांनी जबाबदारी स्वीकारून सर्व व्यवस्था भक्तिभावाने पार पाडली.

मंगलनाथ यात्रा महोत्सवाची सुरुवात संत सितारामजी महाराज यांच्या आशीर्वादाने करण्यात आली होती. त्यांच्या कृपाशीर्वादामुळे संपूर्ण कथा सप्ताहात धार्मिक वातावरण निर्माण झाले. दररोज सकाळी आणि सायंकाळी मोठ्या



संख्येने भाविक उपस्थित राहून शिवमहापुराणातील विविध अध्यायांचे श्रवण करीत होते. कथेचे प्रवक्ते दंडी स्वामी अनंत श्री श्रीविभूषित श्रीमत्परमहंस श्री श्री हरीहरानंद भारती स्वामीजी यांच्या अमृततुल्य वाणीमधून भगवान शंकरांच्या महिमेचे, भक्तीचे, धर्माचरणाचे आणि मानवकल्याणाच्या संदेशाचे प्रभावी निरूपण करण्यात आले. त्यांच्या ओजस्वी आणि रसाळ प्रवचनामुळे उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. शिवतत्त्व, भक्तीमार्ग, कर्मयोग आणि आध्यात्मिक साधनेचे महत्त्व त्यांनी सोप्या आणि प्रभावी शब्दांत स्पष्ट केले. दि. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत कथेची सांगता होत असून, या वेळी विशेष पूजा, आरती आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सांगता सोहळ्यानिमित्त मंदिर परिसरात आकर्षक सजावट करण्यात आली असून, भाविकांसाठी आवश्यक सोयीसुविधांची व्यवस्था करण्यात आली आहे.या धार्मिक कार्यक्रमासाठी माजलगाव शहरासह परिसरातील अनेक गावांमधून भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहत आहेत. महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिकांचा सहभाग विशेष उल्लेखनीय आहे. संपूर्ण मंदिर

पान २ वर

# गुरुवर्य चैतन्य महाराज देगलूरकर यांच्या तीन दिवसीय प्रवचन मालेचे आयोजन



माजलगाव दि.१६ (प्रतिनिधी)प्रति वर्षाप्रमाणे यावर्षी देखील श्री संत धुंडा महाराज देगलूरकर सेवा प्रतिष्ठान माजलगाव आणि राजस्थानी सेवा समाज माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवर्य चैतन्य महाराज देगलूरकर यांच्या रसाळ वाणीतून तीन दिवसीय प्रवचन मालेचे आयोजन माजलगाव येथे करण्यात आले आहे.

हे प्रवचन मालेचे १६ वे वर्षे आहे. तर प्रवचनाचा विषय हरिपाठ हा असून या अमृतमय प्रवचनाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री संतधुंडा महाराज देगलूरकर सेवा प्रतिष्ठान व राजस्थानी सेवा समाज माजलगाव यांच्या वतीने करण्यात आले आहे. फाल्गुन शुद्ध १ ते फाल्गुन शुद्ध ३ बुधवार दिनांक १८ फेब्रुवारी ते शुक्रवार दिनांक २० फेब्रुवारी २०२६ दररोज सायंकाळी साडेसहा ते साडेआठ या वेळेमध्ये राजस्थानी मंगल कार्यालय माजलगाव येथे श्री ज्ञानेश्वर माऊलींचा हरिपाठ या विषयावर प्रवचन मालेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सर्व भाविकांनी याचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.